# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. ०५/०५/२००६
## (दि. ०५/०५/२००६ रोजीची तहकुब सभा)

मिरा भाईंदर महानगरपालिकेची दिनांक ०५/०५/२००६ रोजीची तहकुब स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक ०५/०५/२००६ रोजी सभा सुचना क्र. ०२ दि. २९/०४/२००६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.२० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सभापती |
| २) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ३) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| ४) | श्री. मिलन गोविंदराव पाटील | सदस्य |
| ५) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ६) | श्री. केशव रामभाऊ घरत | सदस्य |
| ७) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ८) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| ९) | श्रीम. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| १०) | श्रीम. जानी कैलाशबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ११) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| १२) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| १३) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |

### गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| २) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| ३) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |

**मा. सभापती :-**

तहकुब सभेला सुरुवात करण्यात यावी. अशी मी सचिवांना सुचना करतो.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ०१ चे वाचन केले.)

**प्रभात पाटील :-**

मला एवढेच विचारायचे आहे की जो विषय पान क्र.१ पासून सुरु झालेला आहे. तो बऱ्याच पानांपर्यंत वाढलेला आहे. माझ्या आठवणीप्रमाणे तो विषय बराच गाजलेला होता आणि ती सभा जेवणानंतर सुरु झालेली होती. त्या विषयाचे पुढे काय झाले? एवढेच मला विचारायचे आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुम्ही कुठल्या विषयाबाबत बोलत आहात.

**प्रभात पाटील :-**

मी नोकर भरतीच्या विषयाबाबत बोलत आहे. त्या विषयाचे नक्की काय झाले? ते सांगा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी सभापती महोदयांच्या अनुषंगाने खुलासा करतो की, मागच्या सभेमध्ये सर्व सन्मा. सदस्यांनी मांडलेल्या भावनेच्या अनुषंगाने व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या विहित तरतुदीनुसार ७० खुल्या वर्ग-४ प्रवर्गाची जी पदे भरावयाची होती. त्या अनुषंगाने एम्प्लॉयमेन्ट कार्यालयाकडून मागवलेल्या यादीशिवाय स्थानिकांना प्राधान्य देण्याच्या अनुषंगाने खुली जाहिरात देण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने अर्ज

प्राप्त झालेले आहेत. त्या अर्जाची छाननी चालू आहे. छाननी पूर्ण झाल्यानंतर येणाऱ्या पंधरा दिवसानंतर सर्वांना पुनःश्च मुलाखातीचे पत्र दिले जाईल व त्याची सविस्तर मुलाखत घेऊन ती कार्यवाही अंतिम केली जाईल.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपली स्थायी समितीची सभा दि. ७ एप्रिल रोजी झालेली होती. तेव्हा तुम्ही सांगितले होते की, त्यावेळेला सिग्नलच्या जक्शनपासून साईबाबा मंदिरापर्यंत टेम्पो स्टॅन्ड अडवणार आहोत असे आपण सांगितले होते. आता त्याला भरपूर दिवस झालेले आहेत त्या ठिकाणी डिव्हायडर बसवायला घेतलेले आहेत. बस वगैरे डायरेक्ट राईट साईडला येतात. मग त्यांना अडवायला कोण जबाबदार आहे? तुम्ही ते टेम्पो तिथुन हलवणार आहात की नाही? आपल्याला साहेबांनी पर्यायी जागा सुचवलेली होती. आपण धर्मकाटा गल्लीमध्ये टेम्पो स्टॅन्ड हलविणार होतो.

**रतन पाटील :-**

अजूनपर्यंत तशी कार्यवाही चालू केलेली नाही. ते भंगारवाले गाड्या रस्त्यामध्ये लावतात.

**प्रेमनाथ पाटील :-**

त्या ठिकाणी एक दोन दिवसात ॲक्सीडंन्ट होणार आहे.

**मोहन पाटील :-**

मा. सभापती महोदयांच्या परवानगीने बोलू इच्छितो की जेव्हा मिरा भाईंदरच्या ३२ कोटीचा काँक्रीटचा रस्ता झाला. आपण तो रस्ता मागच्या वेळेला प्रस्तावित केलेला होता. तो रस्ता सेम तिथपर्यंत आला पाहिजे असा आपला उद्देश होता. रस्ता नसल्या कारणाने तेथील लोकांचे बरेच हाल होत आहेत. परंतु, त्या ठिकाणी ज्या पध्दतीने गाड्या लावलेल्या आहेत. तुम्ही त्या गाड्या 'पार्कींग झोन' व 'नो पार्कींग झोन' त्यांनी जे काही टेन्डर घेतलेले आहे त्याची तो कॉन्ट्रॅक्टर वसुली करतो का? ते बघा. जर तो कॉन्ट्रॅक्टर वसुली करत असेल तर आपल्याकडे त्यासाठी बऱ्याच जागा आहेत. कारण आपण खुप चांगला रस्ता बनवलेला आहे. आपण त्या रस्त्याला मधोमध डिव्हायडर केलेले आहे. त्यामुळे कुठल्याही गाडीला यायला-जायला प्रॉब्लम होणार नाही. गाड्यांची संख्यासुध्दा जास्त आहे की. गाड्या बाहेर काढल्या तरी ट्रॅफीक जाम होते.

**प्रभात पाटील :-**

मी तुम्हाला एक गोष्ट सांगू इच्छिते की, जर एमर्जन्सीचा रस्ता नसता तर आजही तिथे ट्रॅफीक जाम झाले असते. बऱ्याचश्या गाड्या नवघर रोडच्या विमल डेरी लेनमधून सरळ जातात. त्यामुळे तिथे अजुनही ट्रॅफीक जाम झाले असते.

**मोहन पाटील :-**

तुम्ही आम्हाला त्याबाबत थोडीशी माहिती द्या. तुम्ही कोणत्या पध्दतीने गाड्या लावायचे सांगितलेले आहे ते आम्हाला सांगा कारण आडव्या पध्दतीने गाड्या लावायची सिस्टिम कुठेही नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्ही त्या लोकांना सरळ गाड्या लावायला सांगा.

**मोहन पाटील :-**

सरळ गाड्या लावा. मिरा भाईंदरमध्ये आल्यावर भाईंदर पूर्वेला जायचे असेल तर तुम्ही पालिकेला एक भुषण दिलेले आहे असे मला वाटते.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, गेल्या वेळेला पार्कींगचे काम दोन दिवसात पूर्ण करतो असे सांगितलेले होते. परंतु, पूर्ण झालेले नाही.

**प्रभात पाटील :-**

पार्कींगचे काम दोन दिवसात पूर्ण करतो असे सांगून पंधरा दिवस झालेले आहेत.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मागच्या वेळची मिटींग संपल्यानंतर आपण संबंधित विभागाला सुचना दिलेल्या होत्या. आता त्याची कार्यवाही झाली की नाही झाली आपण त्याचे रिव्हॅल्युएशन करु.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही सुचना देता. परंतु, त्या सुचनांचे पालन होत नाही आणि ते प्रत्येक वेळेला ते रिमाईन्ड करता.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, मिरा रोडला असलेल्या रस्त्याच्या गटारावर झाकणेच नाहीत. त्या दिवशी प्लेझंट पार्कसमोरील गटारामध्ये एक लहान मुलं पडले होते.

**मिलन पाटील :-**

साहेब, दुसरी गोष्ट म्हणजे आता जो रस्ता झालेला आहे. तिथे नं. १, नं. २ आणि नं. ३ अशाप्रमाणे टेम्पो लावतील. आपण टाकीवर जायचा रस्ता सोडला होता तर थोडे टेम्पो उभे राहू शकतील. ते टेम्पो अर्धे इकडे आणि अर्धे तिकडे असे दोन्हीकडे उभे राहू शकतील. परंतु, टेम्पो नंबरवाईस उभे रहायला पाहिजेत. त्या

टेम्पोला नंबर द्यायचे नं.१, नं.२, नं.३ चा टेम्पो असे नंबर देऊन टेम्पो पुढे पाठवायचे. जो दादागीरी करतो तोच तिथे टेम्पो नंबरवाईस लावा.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही इंडस्ट्रियल रस्त्याला टेम्पो लावायला सांगा.

**मिलन पाटील :-**

आता त्या रस्त्याला फाटक बंद आहे आणि मधला पॅसेज रिकामा आहे.

**रतन पाटील :-**

एका बाजुला डम्परची लाईन असते.

**मिलन पाटील :-**

आपल्याला डम्परशी काहीही देणं घेणं नाही.

**रतन पाटील :-**

परंतु, त्या ठिकाणी डम्पर आहे.

**मिलन पाटील :-**

डम्पर असेले तरी हरकत नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

इंडस्ट्रियल रोडवरुन प्रायव्हेट गाड्या आणि टेम्पोसुध्दा जातात.

**मिलन पाटील :-**

प्रायव्हेट गाड्यासुध्दा रस्त्यावर उभ्या असतात.

**प्रभात पाटील :-**

मा. सभापती महोदय, मला एवढेच बोलायचे आहे की आपण तीन दिवसामध्ये गॅरेज हलविणार होतो. परंतु, ते गॅरेज हलविले नाही. आता पंधरा दिवस झालेले आहेत. वाहतुक बेटावरुन इंद्रलोकला जाणाऱ्या रस्त्यावर दोन-तीन गॅरेजेस अशी आहेत की आपली एक गाडी पास व्हायला कठीण होते. मी त्या गॅरेजच्या संदर्भात खुप वेळा बोलली होती तुम्ही इतरांच्या सोयीसाठी रस्ते बांधले असतील तर तेस सांगा. आपण तिथे एक-एक गॅरेज काढू.

**मिलन पाटील :-**

तुम्ही अतिक्रमण विभागाच्या लोकांनासुध्दा बोलवा.

**प्रेमनाथ पाटील :-**

रु. ५० लाख ते रु. ६० लाखपर्यंतचा खर्च गाळ्यांसाठीच लागला असेल.

**प्रभात पाटील :-**

साहेब, तर आपण त्या गॅरेजसाठी रस्ते बांधले असतील किंवा ते रस्ते गाई, गोठ्यासाठी बांधले असतील तर तसे डिक्लेअर करा.

**सुर्यकांत भोईर :-**

मा. सभापती महोदय, आपण जो काही भाईंदरचा रस्ता बनविलेला आहे. तेथील नाले आणि गटारावर झाकणे नाहीत. तुम्ही झाकणांची व्यवस्था करावी.

**दिपक खांबित :-**

सन्मा. सदस्य प्रेमनाथ पाटील साहेब, टेम्पो स्टॅन्ड कुठे शिफ्ट करायचा?

**प्रेमनाथ पाटील :-**

टेम्पो स्टॅन्ड धर्मकाट्याच्या टेम्पो स्टॅन्ड समोर शिफ्ट करायचा.

**दिपक खांबित :-**

तिथे बिल्डींगचे काम सुरु आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

तो रस्ता ओपनच आहे. आपण जी इंडस्ट्री बांधलेली आहे त्या रोडला टेम्पो स्टॅन्ड सुरु करा.

**दिपक खांबित :-**

परंतु, तिथे प्लींथचे काम सुरु आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मग तुम्ही तो टेम्पो स्टॅन्ड तसाच ठेवणार?

**दिपक खांबित :-**

आपण पोलिस आणि टेम्पो चालकांना बोलावून ब्रीजच्या ठिकाणी टेम्पो स्टॅन्डला जागा देता येईल.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्ही तिथे टेम्पो स्टॅन्ड करा. तो रोड सुटसुटीत होईल.

**दिपक खांबित :-**

भाईंदर ईस्टला ब्रीजचे जे सर्हिस रुट आहेत. आपल्याला तिथे टेम्पो स्टॅन्ड देता येईल. आपण त्या लोकांना बोलावून त्यांचा डिसीजन घेऊया.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण रु. ६० लाख खर्च करुन काहीही उपयोग नाही. कारण तिकडे एक-दोन दिवसानंतर ॲक्सीडंन्ट होणारच आहे.

**दिपक खांबित :-**

परंतु, आपल्याला याबाबत पोलिसांबरोबर चर्चा करायला हवी.

**मोहन पाटील :-**

आपल्याला पोलिसांबरोबर चर्चा करायची काहीही गरज नाही.

**दिपक खांबित :-**

आपल्याला पोलिसांच्या पदाधिकाऱ्यांना चर्चेसाठी बोलवावे लागेल.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, आपण ती जागा टेम्पोवाल्यांना दिलेली आहे का?

**मा. सभापती :-**

प्रथम पोलिसांना चर्चेसाठी बोलवावे लागेल.

**प्रभात पाटील :-**

पोलिस अजिबात येणार नाहीत.

**रतन पाटील :-**

तुम्ही प्रथम पोलिसांना विनंती करा आणि नंतर स्टॅन्डसाठी जागा द्यायला सुरुवात करा.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण त्यांना ती जागा दिलेली नसल्यामुळे आपल्याला बोलण्याचा प्रश्न येत नाही.

**प्रभात पाटील :-**

आपली जागा असल्यामुळे आपल्याला पोलिसांशी बोलण्याचा प्रश्न येत नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण स्टॅन्डसाठी रु. ६० लाख खर्च केलेला आहे.

**मा. सभापती :-**

श्री. दिपक खांबित, तुम्ही ओव्हर ब्रीजखाली टेम्पो स्टॅन्डची व्यवस्था करा.

**दिपक खांबित :-**

आपण ब्रीजखाली टेम्पो ठेवायला जागा देऊया.

**रतन पाटील :-**

साहेब, टेम्पो ठेवायला ब्रीजच्याखाली समोरच्या रस्त्यावर जागा द्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

श्री. दिपक खांबित साहेब, तुम्ही कधी कार्यवाही करणार आहात? ते सांगा. कारण आपल्याला ब्रीजखाली भाडे येणार आहे.

**ज्युडी डिसोझा :-**

तुम्ही त्या ठिकाणी पे ॲन्ड पार्क करा.

**प्रभात पाटील :-**

प्रथम टेम्पो आहेत तिथुन उचला.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सुरुवातीला सगळे टेम्पो तिथे शिफ्ट होऊ द्या. मग तिथे एकदा कार्यवाही झाली की आपण किती भाडे वसुल करायचे वगैरे बघू.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, तिथे एकदा सगळे टेम्पो घुसले तर पुन्हा निघणार नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

टेम्पो ब्रीजच्याखाली पार्क केल्यामुळे आपल्या मिरा भाईंदर शहराची शान जाते. तुम्ही टेम्पो वगैरे इंडस्ट्रीकडे पार्क करा.

**मोहन पाटील :-**

आम्ही ज्या गाड्या ठेवलेल्या आहेत. त्या तुमच्या परवानगीने ठेवलेल्या नाहीत. आपण त्याला परवानगी दिलेली नाही. आत ब्रीजखाली गाड्या ठेवायचा विषय आलेला आहे. परंतु, मला असे वाटते की ब्रीजखाली गोडाऊन होऊ शकते. आपल्याला त्या गोडाऊनचे भाडे मिळेल.

**रतन पाटील :-**

आपल्याला गोडाऊनचे भाडे मिळेल.

**सुर्यकांत भोईर :-**

आपल्याला ब्रीजखाली भाडे मिळेल.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्याला ब्रीजच्याखाली मार्केट करता येईल. मार्केटलासुध्दा पार्कींग लागते.

**मोहन पाटील :-**

साहेब, हे कमर्शियल पार्कींग आहे. तुम्हाल कमर्शियल पार्कींगची काहीही आवश्यकता नाही.

**प्रभात पाटील :-**

साहेब, टेम्पोवाल्यांनी त्यांच्या बिझनेससाठी टेम्पो घेतलेले आहेत. त्याच्यामध्ये आपला काहीही संबंध नाही. टेम्पोवाल्यांनी त्यांचा टेम्पो उचलून त्यांच्या परिसरात बांधावा.

**रतन पाटील :-**

महापालिकेला कुठल्याही पध्दतीने कर येतो.

**मा. सभापती :-**

असे काही नसते. भले ते टेम्पोवाले पैसे कमावत असतील तरी त्या टेम्पोवाल्यांची सोय करुन देणे हे आपले कर्तव्य आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, कर्तव्य असलं तरीसुध्दा तुम्ही बघा.

**जयंत पाटील :-**

या शहरामध्ये इंडस्ट्रीज आहेत. तसेच, या शहरामधील लोकांना अनेक वेळ प्रसंगी टेम्पो लागतात. या शहराला टेम्पो लागणे ही या शहराची गरज आहे. त्यांच्या प्रतिनिधींना बोलवा आणि त्या लोकांना योग्य ठिकाणी जसे ॲडजेस्ट करता येईल तेस तुम्ही ॲडजेस्ट करा. जेणेकरुन आपल्या ट्रॅफीकला त्रास होणार नाही.

**प्रभात पाटील**

तुम्ही बोलावले तरी ती लोक येणार नाहीत.

**जयंत पाटील :-**

दुसरी गोष्ट म्हणजे आज आपण जो काही ठराव करणार आहोत. तो या शहरातील बऱ्याच नेत्यांकडे जाणार आहे. ते नेतेसुध्दा चर्चा करतील आणि हा ठराव तिकडे बारगळेल. तेव्हा आपल्याला त्या लोकांना योग्य मार्गाने कसे मार्गदर्शन करा. रस्तासुध्दा मोकळा होईल.

**गजानन भोईर :-**

सगळ्यांकडे मोबाईल असल्यामुळे टेम्पोवाल्यांना फॅक्टरीवाले बोलावतील. त्यामुळे फॅक्टरीपासून लांब द्या.

**प्रभात पाटील :-**

परंतु, आपण पोलिसांना चर्चेला बोलावले तर ते चर्चेला येणार नाहीत. ते जागा सोडणार नाहीत.

**दिपक खांबित :-**

आपण पोलिसांना बोलावणार आहोत.

**गजानन भोईर :-**

टेम्पोवाल्यांना कुठेतरी लांब जागा दिली किंवा या लोकांना अडथळा येणार नाही तिथे जागा दिली तरी चालेल.

**कैलासबेन जानी :-**

तुम्ही टेम्पोवाल्यांना भाईंदर पश्चिमच्या एस.टी. स्टॅन्डकडे टेम्पो पार्क करायला सांगा.

**दिपक खांबित :-**

साहेब, तिथे अडचण होणार आहे.

**गजानन भोईर :-**

हा विषय चर्चेला आल्यानंतर ह्या विषयाची कार्यवाही करुया.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, गेल्या वेळेला केबीन रोडला जाणाऱ्या रावलनगर रस्त्यावर भरणी केलेली होती. आपण त्या रस्त्यासाठी खर्च केलेला होता आणि आपला तिथे टेम्पो स्टॅन्ड करण्याचा उद्देश होता. मग तुम्ही तिकडे टेम्पो स्टॅन्ड का करत नाही?

**प्रेमनाथ पाटील :-**

आता तिथे फ्लाय ओव्हर ब्रीज झालेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तिथे फ्लाय ओव्हर ब्रीज झालेला नाही.

**रतन पाटील :-**

तिथे अर्धा फ्लाय ओव्हर ब्रीज झालेला आहे.

**मोहन पाटील :-**

तो ६० फुट रोड आहे. त्या रोडला रेल्वेची मार्जिन सोडून गाड्या उभ्या राहू शकतात. पूर्वी त्या ठिकाणी इमारती नव्हत्या. तिथे एक प्लॉट व्हॅकेन्ट आहे. कोणीही प्लॉटमध्ये गाड्या उभ्या करायला देणार नाही. शिवाय, त्या ठिकाणी दोन्ही साईडला भरपूर गाड्या लागतात. त्यामुळे तिथे जागा ॲकोमडेट होणार नाही. आपल्याला तिकडे टेम्पो पार्क करायला हरकत नाही. परंतु, तिकडे टेम्पो पार्क केल्यानंतर बिल्डींगवाले ऑब्जेक्शन घेतील.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेब, हे शहर मोठे असल्यामुळे गाड्या एकाच ठिकाणी पार्क करायला जाणार नाहीत. गाड्या वेगवेगळ्या ठिकाणी पार्क कराव्या लागतील.

**प्रेमनाथ पाटील :-**

रिक्षासाठी वेगळा स्टॅन्ड, पेट्रोलसाठी वेगळा स्टॅन्ड, फोर व्हिलरसाठी वेगळा स्टॅन्ड अशी आखणी करावी.

**मा. सभापती :-**

केबीन रोडला रात्रीच्या वेळेला सगळ्या गाड्या उभ्या राहू शकतात.

**मोहन पाटील :-**

रिक्षा स्टॅन्ड वेगळा आहे. तिथे भरपूर जागा आहे.

**गजानन भोईर :-**

तुम्ही पाठीमागून टर्न मारलेल्या जागेबाबत बोलत आहात का?

**मा. सभापती :-**

मी पाठीमागून टर्न मारलेल्या जागेबाबत बोलत आहे.

**गजानन भोईर :-**

परंतु, ती स्वच्छ जागा आहे.

**मा. सभापती :-**

पाठीमागून टर्न मारलेल्या जागेवरच टेम्पो पार्कींग करा.

**जयंत पाटील :-**

तुम्ही घाईगर्दीत निर्णय घेऊ नका. सर्व चौकशी आणि तपासणी करुन नंतर निर्णय घ्या.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

व्यवस्थित चौकशी करुनच निर्णय घेण्यात यावा.

**मोहन पाटील :-**

निर्णय घ्या असे बोलण्याची परिस्थिती का आली? प्रशासनाने कोणत्या अनुषंगाने टेम्पो तिथे पार्क करायला दिलेले आहेत. आम्ही व्यवस्था करु असे आम्हाला प्रशासनाकडून उत्तर येत आहे. तुम्हाला त्याच्याशी काही देणं-घेणं आहे का?

**प्रेमनाथ पाटील :-**

आता डिव्हायडरचे काम सुरु झालेले आहे. डिव्हायडरमुळे एक बस पार्क होते.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ट्रक टर्मिनल आणि पार्कींगची सुविधा देण्याची महापालिकेची जबाबदारी असते. त्याशिवाय शहराचा उद्योग कसा होईल? आणि लोकांना फॅसिलिटी कशी मिळेल?

**मोहन पाटील :-**

आता डिव्हायडर एवढे केलेले आहे. तुम्हाला अजुन काय पाहिजे?

**जयंत पाटील :-**

तुम्ही त्याचे चार्जेस घेऊ शकता. परंतु, तुम्हाला पार्कींगची व्यवस्था करावी लागेल.

**मा. सभापती :-**

केबीन रोडला तात्पुरती पार्कींगची व्यवस्था करा.

**जयंत पाटील :-**

पार्कींग ही लोकांची गरज आहे.

**रतन पाटील :-**

एका प्लॉटमध्येच पार्कींगची व्यवस्था करा.

**जयंत पाटील :-**

तुम्ही पाच-सहा टेम्पो लागतील अशी व्यवस्था करा.

**मोहन पाटील :-**

परंतु, प्लॉट हा प्रायव्हेट भाग आहे.

**रतन पाटील :-**

मग पार्कींग झोनला दुसरी कुठे जागा आहे?

**मोहन पाटील :-**

केबीन रोडला पार्कीगसाठी जागा आहे.

**रतन पाटील :-**

केबीन रोडला कॉर्नरला पार्कींगसाठी व्यवस्था करा.

**गजानन भोईर :-**

केबीन रोडला नर्मदा कुंज नावाची बिल्डींग आहे. तिथे टेम्पो पार्क करतील.

**रतन पाटील :-**

केबीन रोडला दहा ते बारा टेम्पो राहू शकतात.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील यांच्या म्हणण्याप्रमाणे बारा टेम्पो इकडे, बारा टेम्पो तिकडे, चौदा टेम्पो दुसरीकडे पार्क करायचे.

**मा. सभापती :-**

तिकडे सगळे टेम्पो राहतील एवढी मोठी जागा आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुम्ही म्हटल्याप्रमाणे सगळे टेम्पो एकाच जागेवर पार्क करता येणार नाहीत. आपल्याला काही स्पॉटला ॲडजेस्ट करावे लागतील.

**मा. सभापती :-**

काही टेम्पो धोकादायक रोडला पार्क करायला सांगा आणि काही टेम्पो इकडच्या रोडला पार्क करायला सांगा.

**रतन पाटील :-**

तुम्ही अर्धे टेम्पो इथे पार्क करायचे आणि अर्धे टेम्पो तिकडे पार्क करायचे असे करा. या साईडला छोटे टेम्पो पार्क करायला द्या.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

श्री दिपक खांबित (कार्यकारी अभियंता) आणि आम्ही याची जबाबदारी बघू.

**रतन पाटील :-**

आम्हाला याचा अहवाल पुढच्या मिटींगमध्ये हवा आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही त्याचा अहवाल किती दिवसात देणर आहात?

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्ही ह्याचा अहवाल ॲक्सीडंन्ट होण्यापूर्वी करुन घ्या. त्याठिकाणी डिव्हायडर बसवण्याचे काम सुरु केलेले आहे त्यामुळे त्या ठिकाणी ॲक्सीडंन्ट होणारच आहे.

**मा. सभापती :-**

उद्याच्या उद्या पोलिस मागवून घ्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

एक रिक्षा ठेवून टेम्पो गेला तर मागच्या साईडने रिक्षा जाऊ शकते.

**केशव घरत :-**

मा. सभापती महोदय, आताच सन्मा सदस्या प्रभात पाटील यांनी या इतिवृत्तांतामधील ५३८ कामगारांबाबत चर्चा केलेली होती आणि या चर्चेमध्ये अर्धा दिवस गेलेला होता. मी उपायुक्त सोा. यांना विचारु इच्छितो की सेवा जेष्ठतेनुसार पंधरा दिवसात पदोन्नती देण्याचे ठरले होते. त्याचे काय झाले?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण वर्ग-१ आणि वर्ग-२च्या पदोन्नती अंतिम केलेल्या आहेत. त्यानंतर ती पदे रिक्त झालेली आहेत प्रशासनाने त्या पदांना पदोन्नती देण्याच्या अनुषंगाने कार्यवाही केलेली आहे. आजच निवड समितीच्या बैठकीबाबत मा. आयुक्त साहेबांशी चर्चा झालेली आहे. आम्ही निवड समितीची बैठक येत्या पंधरा दिवसात लावू. तेसुध्दा अंतिम केले जाईल. त्याची पूर्वतयारी पूर्ण केलेली आहे.

**केशव घरत :-**

याचा अर्थ येत्या पंधरा दिवसामध्ये पदोन्नतीचे काम होईल.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

होय.

**गजानन भोईर :-**

आम्हाला याचा आढावा पुढच्या मिटींगमध्ये द्या.

**केशव घरत :-**

आपल्याकडे पदे मंजुर आहेत.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी तुमच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की सध्या आपल्याकडे साधारणपणे ४० पदे रिक्त आहेत त्याच्यामध्ये लिपिक संवर्गाच्या लोकांचा मोठ्या प्रमाणात समावेश आणि त्यांना पदोन्नती दिली जाईल.

**प्रभात पाटील :-**

मी मागच्या वेळेला एक प्रश्न विचारलेला होता तो प्रश्न ह्या प्रोसिडींगमध्ये नसला तरी मी विचारु इच्छिते की तुम्ही ह्या शहरातील चर्मकार लोकांच्या स्टॉलची सर्व्हे करण्याची नोंद केलेली होती. तो सर्व्हे करण्याची सुरुवात झाली की नाही झाली? ते सांगा.

**केशव घरत :-**

आमच्याकडील चर्मकाराने आठ-दहा फेऱ्या मारल्या असतील. ए.टी.पी.ला गेले की सांगतात अतिक्रमण विभागाला पाठवले. अतिक्रमणवाले सांगतात की दहा फेऱ्या मारल्या तरी काहीही होत नाही. आमच्याकडे काल दोनजण आलेले होते. एकाचा आरे सरिताचा स्टॉल मंजुर झालेला होता. ए.टी.पी. कडून पाहणी झालेली होती.

**प्रभात पाटील :-**

सन्मा. सदस्य केशव घरत, माझा तसा प्रश्न नव्हता. माझा प्रश्न वेगळा होता. माझा प्रश्न असा होता की या शहरात सन्मा. सदस्य मिलन पाटील यांच्या नावाने स्टॉल दिलेला आहे आणि तिथे सन्मा. सदस्या प्रभात पाटील व्यवसाय करित आहे. अशा वेळेला सर्व्हे होणे आवश्यक आहे. सन्मा. सदस्य मिलन पाटील यांच्या एका स्टॉलला परमिशन दिली तरी सन्मा. सदस्य मिलन पाटील यांचे या शहरात चार स्टॉल आहेत.

**रतन पाटील :-**

एका माणसाच्या नावावर चार-पाच स्टॉल आहेत.

**प्रभात पाटील :-**

थोड्या दिवसांनी हे शहर चर्मकार लोकांच्या स्टॉलचे शहर होणार आहे की काय? असे वाटायला लागलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब, मी तुम्हाला सेम कमिटमेन्ट सांगितलेले आहे. आपल्या भाईंदर वेस्टला एक चांगले गणपती मंदिर आहे आणि त्या गणपती मंदिराच्या आजुबाजुला स्टॉल लागलेले आहेत. मी मागच्या वेळेला कम्प्लेन्ट केलेली होती. ती कम्प्लेन्ट झाल्यानंतर पुन्हा त्या ठिकाणी स्टॉल लागलेले आहेत.

**प्रभात पाटील :-**

शंकराचे मंदिर हटविण्याबाबत मी लेखी तक्रार केलेली होती.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

महापालिकेतर्फे सुशिक्षित बेकार, अंध, अपंग  या लोकांसाठी जे स्टॉल दिलेले आहेत त्याच्या ज्या अनियमित आहेत किंवा त्या स्टॉलचा मिसयुज करण्याच्या अनुषंगाने मागच्या सभेमध्ये सन्मा. सदस्यांनी हा मुद्दा मांडलेला होता. त्या मुद्याला सर्व सन्मा. सदस्यांनी सहमती दिलेली होती. आम्ही त्या अनुषंगाने दाखला विभागासाठी नविन कक्ष तयार केलेला आहे. त्याच्यासाठी वेगळे ऑफिसर नेमुन दिलेले आहेत. आम्ही याचा सर्व सर्व्हे करुन त्याचा अहवाल तुमच्यासमोर सादर करु. अद्यापपर्यंत तो अहवाल पूर्ण केलेला नाही.

**प्रभात पाटील :-**

तुम्ही कामाला सुरुवात केलेली आहे असा याच्यामधून अर्थ निघतो.

**मिलन पाटील :-**

एक स्टॉल शिवाजी पुतळ्याच्या समोर आहे. तो स्टॉल रस्त्यामध्ये येतो. आपले सगळे ऑफिसर तेथुन जातात. परंतु, एकाही ऑफिसरने तो स्टॉल उचलून बाजुला ठेवलेला नाही. मी मागच्या वेळेलासुध्दा स्टॉलबाबत तक्रार केलेली होती.

**प्रभात पाटील :-**

आपण मंदिरामध्ये चामडे निषिघ्द मानतो आणि हे स्टॉल मंदिरासमोरच आहे.

**मिलन पाटील :-**

तो स्टॉल एकदम रस्त्यावर आहे. म्हणजे स्टॉल लावण्याची किती हद्द झाली ते बघा. ती जी ॲडव्हरटाईजमेन्ट आहे त्याच्यासुध्दा पुढे स्टॉल लावलेला आहे. ते सिग्नलजवळ आहे. अशाप्रकारचे स्टॉल अतिक्रमणवाले हटवू शकत नाही याचा काय अर्थ आहे?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी ह्या इतिवृत्तांतामध्ये दुरुस्ती सुचवितो. माझ्या स्वतःच्या वाक्याबाबत दुरुस्ती आहे. पान क्र.१० वर सन्मा. सदस्य जयंत पाटील साहेबांनी उदाहरण म्हणून ते वाक्य नमुद केलेले हाते. मी अनावधानाने किंवा ते मला बोलले असे समजुन उल्लेख केलेला आहे. मी ते वाक्य विषयपटलामधून मागे घ्यावे अशी मी या ठिकाणी विनंती करतो. सन्मा. सदस्य जयंत पाटील यांनी मला उदाहरण दिलेले होते. ते मला पर्सनली बोलले नव्हते.

**प्रभात पाटील :-**

साहेब, त्याच्यावर तुम्ही रागावले होते का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मला त्यावेळेला ते लक्षात आलेले नव्हते.

(सन्मा. सदस्य मिलन पाटील ह्यांनी ठरावाचे वाचन केले.)

**प्रभात पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**केशव घरत :-**

प्रकरण क्र. २०६ मधील ठराव क्र. १४ मध्ये मी ह्याच्यामध्ये दिलेले होते की घोडबंदर स्मशानभुमीचे वाढीव बांधकाम व रस्ता. तसेच, घोडबंदर गावातील अंतर्गत रस्ते आणि दुरुस्ती. रॉयल कॉलेज ते एम.आय.डी.सी. रस्ता, भाईंदर पूर्व येथील रस्ता, इंदिरानगर नाला ठरावामध्ये सदर कामे समाविष्ट झालेली नसल्यामुळे समाविष्ट करुन घेण्यात यावीत.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, काशिमिरा ते प्लेझेंट पार्क, ६० फुटी रस्त्याचासुध्दा समावेश करुन घ्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, आमच्या प्रभागातील रस्त्याचासुध्दा समावेश करा.

**सुर्यकांत भोईर :-**

काशिमि-यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज नाका ते प्लेझेंट पार्क येथील डॉन बास्को स्कुलपर्यंतच्या रस्त्याचासुध्दा समावेश करुन घ्या.

**गजानन भोईर :-**

श्री. खांबित साहेब, आम्ही नवघरनाका ते गोडदेव पर्यंतच्या गटाराबाबत सुचना केलेली होती. आम्हाला पंधरा दिवसापूर्वी काम सुरु करणार आहोत असे सांगितलेले होत. परंतु, ते काम अजुनपर्यंत सुरु झालेले नाही.

**दिपक खांबित :-**

त्या गटाराच्या टेन्डरचे काम पूर्ण झालेले आहे.

**मिलन पाटील :-**

सन्मा. सदस्य केशव घरत, सन्मा. सदस्य सुर्यकांत भोईर, सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील यांनी मांडलेल्या सुचनांचा ठरावामध्ये समावेश करावा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आमची रस्त्याची सुचना होती. ती सुचना समाविष्ट करावी.

**मा. सभापती :-**

इतिवृत्तांताचा ठराव मंजुर झालेला आहे.

**प्रकरण क्र. १० :-**

दि. १४/०२/२००६ व दि. २१/०२/२००६ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ११ :-**

दि. १४/०२/२००६ व दि. २१/०२/२००६ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. मिलन पाटील.** **अनुमोदन :- श्रीम. प्रभात पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिव ह्यांनी प्रकरण क्र. ११ चे वाचन केले.)

**प्रेमनाथ पाटील :-**

या दौ-यासाठी सगळ्या महिला जाणार आहेत का?

**सुर्यकांत भोईर :-**

या दौ-यासाठी सगळ्या महिला असतील की फक्त महिला व बालकल्याण समितीच्याच महिला असतील याचा प्रथम खुलासा करा.

**नगरसचिव :-**

या दौ-यासाठी सगळ्या महिला जाणार आहेत.

**प्रभात पाटील :-**

परंतु, त्यांनी या ठिकाणी नऊ महिला व बालकल्याण समितीच्या सदस्या आणि एकूण तीस सदस्या असे म्हटलेले आहे. म्हणून आमचा गोंधळ झालेला आहे.

**नगरसचिव :-**

या दौऱ्यासाठी एकूण तीस महिला सदस्या जाणार आहेत.

**सुर्यकांत भोईर :-**

आम्हाला सर्व काही मंजुर आहे.

**नगरसचिव :-**

मी महिला व बालकल्याण समितीच्या सभेला हजर होतो.

**मा. सभापती :-**

या दौऱ्यासाठी महिला व बालकल्याण समितीच्या सर्व सन्मा. सदस्यांना प्रशिक्षणासाठी जायचे ठरलेले आहे. त्यामुळे आपण हा विषय महासभेला घेऊया.

**ज्युडी डिसोझा :-**

हा विषय इथे मंजुरीला आलेला असल्यामुळे महासभेला जाणारच आहे.

**जयंत पाटील :-**

हा विषय महासभेला घेण्यात यावा.

**प्रभात पाटील :-**

हा दौरा सर्वसाधारणपणे महिला व बालकल्याण समितीचा दौरा आहे. त्यामुळे हा विषय महासभेला जाणारच आहे. परंतु, तुम्ही एकंदर सगळा ठराव महासभेला द्या.

**जयंत पाटील :-**

हा शैक्षणिक दौरा आहे ना. मग इतर सदस्यांचा हा दौरा नाही का?

**ज्युडी डिसोझा :-**

या दौऱ्यासाठी फक्त महिला सदस्याच जाणार आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

माझ्यामते हा दौरा फक्त महिला व बालकल्याण समितीच्याच महिलांचा नसुन सर्व महिला सदस्यांचा आहे.

**प्रभात पाटील :-**

तुमचा पुढे शैक्षणिक सहलीबाबतचा विषय आहे तेव्हा चर्चा करुया.

**ज्युडी डिसोझा :-**

तुमचा शैक्षणिक सहलीबाबतचा विषय पुढे आहे. तेव्हा बघूया.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

महिला वेगळ्या जाणार आणि आम्ही वेगळे जाणार. त्यापेक्षा दोन्ही विषय एकत्र करुन द्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

सचिव साहेब, शैक्षणिक सहलीसाठी सर्व नगरसेवक, नगरसेविका जाणार आहेत की फक्त कमिटीचे नगरसेवक, नगरसेविका जाणार आहेत? याचा खुलासा करावा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

संबंधित समितीचे नगरसेवक, नगरसेविका जाण्याचे फिक्स झालेले आहे.

**नगरसचिव :-**

पुढचा विषय स्थायी समितीच्या सभापतींकडून आलेला आहे.

**प्रभात पाटील :-**

स्थायी समितीचे सदस्य जाणार आहेत. मग तुम्ही महिला व बालकल्याण समितीच्या सदस्यांना कशाला कन्फ्युज करता? महिला व बालकल्याण समितीच्या सदस्यांनी मागच्या वर्षीसुध्दा दौरा केलेला होता.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सगळा दौरा एकत्रित करावा असे स्थायी समितीच्या सभापतींचे म्हणणे आहे.

**प्रभात पाटील :-**

तुम्ही सगळा दौरा एकत्रित करा. आमचा त्याला विरोध नाही.

**ज्युडी डिसोझा :-**

परंतु, तुम्ही विषय मंजुर करुन घ्या.

**गजानन भोईर :-**

सगळे एकत्रित जाऊया. याचा काय अर्थ आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सगळे एकत्रित जाऊया. म्हणजे सगळे सदस्य एकत्र दौऱ्याला जाऊया.

**सुर्यकांत भोईर :-**

सगळे सदस्य म्हणजे स्थायी समितीचे सर्व सदस्य असा अर्थ होतो का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सर्व सदस्यांना दौऱ्याला जायचे आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

सर्व नगरसेवकांनी दौऱ्याला जायचे आहे.

**प्रभात पाटील :-**

महिला व बालकल्याण समितीचाचा विषय चर्चेला आला तर सर्व सदस्यंचे ऑब्जेक्शन सुरु होते.

**जयंत पाटील :-**

तुम्हाला फक्त याच विषयावर बोलावे लागेल. तुम्ही इतर विषय ॲड करु नका.

**ज्युडी डिसोझा :-**

तुम्ही प्रथम विषय मंजुर करुन घ्या आणि नंतर काय ते ठरवा.

**प्रभात पाटील :-**

तुमचा हा वेगळा विषय आहे.

**जयंत पाटील :-**

हा वेगळाच विषय आहे.

**कैलासबेन जानी :-**

हा फक्त महिलांचाच विषय आहे.

(सन्मा. सदस्या ज्युडी डिसोझा ह्यांनी ठरावाचे वाचन केले.)

**मिलन पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

मा. सभापती महोदय, हा ठराव सर्वानुमते मंजुर करा.

**जयंत पाटील :-**

मा. सभापती महोदय, हा ठराव महासभेत पाठवा असे तुम्ही मघाशी रुलिंग दिलेले आहे.

**प्रभात पाटील :-**

हा विषय महासभेचा नाही.

**जयंत पाटील :-**

मग सभापती महोदयांनी असे कसे रुलिंग दिले?

**प्रभात पाटील :-**

सगळ्यांचा दौरा एकत्र घ्यावा असे मा. सभापती महोदयांचे रुलिंग होते.

**जयंत पाटील :-**

परंतु, या विषयावर चर्चा झालेली आहे.

**ज्युडी डिसोझा :-**

या ठिकाणी दौऱ्याबाबतचा प्रकरण क्र.१८ चा दुसरासुध्दा विषय आहे.

**प्रभात पाटील :-**

माझी तुम्हाला विनंती आहे की तुम्ही मन मोठं करा.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्या प्रभात पाटील, असे मन मोठे करुन कसे चालेल? आपल्याला सर्वांना ठरवून ठरावाबाबत कार्यवाही करावी लागेल. फक्त असेच सांगुन चालणार नाही.

**ज्युडी डिसोझा :-**

आपल्या बजेटमध्ये महिलांसाठी तरतुद ठेवलेली आहे.

**मा. सभापती :-**

आपल्या बजेटमध्ये महिलांसाठी तरतुद असली तरी हा विषय महासभेत घेतला तर काहीही बिघडत नाही.

**प्रभात पाटील :-**

महिलांच्या अभ्यास दौऱ्याचा विषय महासभेचा नाही. गेल्या वर्षी ह्या विषयाला महासभेने मंजुरी दिलेली होती. मग हा विषय महासभेत का घ्यायचा?

**ज्युडी डिसोझा :-**

स्थायी समितीची सभा कधीही लागते. परंतु, महासभा कधीही लागत  नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

हा विषय महासभेचा नाही.

**कैलासबेन जानी :-**

हा विषय महासभेला घेणार आहे हे याच कमिटीमध्ये मंजुर केलेले होते.

**सुर्यकांत भोईर :-**

परंतु, हा विषय महासभेचा नाही.

**मा. सभापती :-**

हा विषय महासभेत घ्यायचा आहे. परंतु, या दौऱ्याला बाहेरच्या कोणत्या सदस्या येणार आहेत? त्याचा खुलासा करा.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. सभापती साहेब, बाहेरचे कोणलाही घ्यायचे नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

बाहेरच्या कोणत्याही सदस्या येणार नाहीत. बाहेरच्या कुठल्याही सदस्यांना या दौऱ्यासाठी बोलावणार नाही.

**प्रभात पाटील :-**

बाहेरच्या सदस्यांना बोलावलेले नाही.

**मिलन पाटील :-**

मा. सभापती साहेब, हा अजेन्डा बनविताना तुम्हाला हा अजेन्डा दाखविला जातो की नाही याचा प्रथम खुलासा करा.

**कैलासबेन जानी :-**

या ठिकाणी ३० महिलांचाच विचार केला जात आहे.

**मा. सभापती :-**

परंतु, बाहेरच्या महिला येणार आहेत का?

**सुर्यकांत भोईर :-**

बाहेरच्या महिला कशाल येतील? फक्त महिला नगरसेविकाच या दौऱ्याला येतील.

**ज्युडी डिसोझा :-**

या दौऱ्यासाठी फक्त नगरसेविकाच येतील. बाहेरच्या महिला येणार नाहीत. तसे असेल तर तुम्ही सहलीसाठी नऊ नगरसेविकांचाच विचार करा.

**प्रभात पाटील :-**

तुम्ही सहलीसाठी नऊ महिला नगरसेविकाच घ्या.

**मा. सभापती :-**

नगरपालिकेतील गोष्टी वेगळ्या आहेत आणि बाहेरच्या लोकांच्या वेगळ्या गोष्टी आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

या दौऱ्याला बाहेरच्या नगरसेविका जाणार नाहीत.

**सुर्यकांत भोईर :-**

बाहेरच्या नगरसेविका जाणार आहेत हे तुम्हाला कोणी सांगितले?

**कैलासबेन जानी :-**

बाहेरच्या महिला दौऱ्याला जाणार नाहीत. फक्त महिला नगरसेविकाच दौऱ्याला जाणार आहेत.

**ज्युडी डिसोझा :-**

फक्त तीस महिला नगरसेविकाच दौऱ्याला जाणार आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

सचिव साहेब, आपण गेल्या वर्षी महिला नगरसेविकांबाबत ठराव पास केलेला होता आणि त्यप्रमाणे महिला नगरसेविका घेतलेल्या होत्या. मग आता मा. सभापती साहेब सारख्या सारख्या बाहेरच्या महिलांचा उल्लेख का करतात?

**कैलासबेन जानी :-**

या ठिकाणी बाहेरच्या महिलांचा उल्लेख केलेला नाही.

**प्रभात पाटील :-**

या ठिकाणी महिला सदस्या असे म्हटलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेबांचे मिस अंडरस्टॅन्डीग झालेले आहे.

**मोहन पाटील :-**

आपला आता पुढे विषय आहे. आपण त्या विषयाला कलाटणी देऊन विषय घेऊया.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आम्ही त्याच विषयाबाबत बोलत आहोत.

**मोहन पाटील :-**

मागच्या वेळेलासुध्दा असाच विषय आलेला होता. जर एका ठिकाणी तीस महिला गेल्या तर आपण आपल्या सदस्यांना घेऊन निघुया म्हणजे तीस महिला वेगळ्या जातील आणि आपण वेगळे जाऊ. म्हणजे स्थायी समितीच्या वगैरे सगळ्या महिला एकत्ररित्या दौऱ्याला जातील. महिला व बालकल्याण समितीमार्फत केलेला खर्च त्या समितीकडूनच होईल आणि आपण बाकीच्या नगरसेवकांचासुध्दा दौरा करणार आहोत. तो दौरासुध्दा होऊन जाईल. म्हणजे एका वेळेला दोन्ही दौरे होतील. आणि महिला सगळे एकत्रच दौऱ्याला जातील.

**मिलन पाटील :-**

सचिव साहेब, तुम्ही हा अजेन्डा काढताना हा सभापतींना दाखविला होता का?

**नगरसचिव :-**

होय.

**मिलन पाटील :-**

तुम्ही हा अजेन्डा सभापतींच्या परवानगीने काढताना, सभापतींना दाखविलेला असताना त्यावेळी त्यांनी ऑब्जेक्शन का घेतले नाही? त्यावेळी सभापतींना कळले नव्हते का?

**मा. सभपाती :-**

माझ बोलण्याचा तसा उद्देश नाही.

**मिलन पाटील :-**

तुम्ही त्यावेळेला का ऑब्जेक्शन घेतलेले नव्हते? आता अजेन्ड्यावर विषय घेतल्यानंतर तुम्ही विषय पास केला. आम्ही महिला प्रशिक्षण दौऱ्याचा विषय पास करण्याबाबत ठराव मांडलेला आहे आणि तुम्ही आता बोलता की हा विषय महासभेत घ्या. हे योग्य नाही.

**ज्युडी डिसोझा :-**

महिला प्रशिक्षण दौऱ्याचा विषय महासभेचा विषय नाही.

**मिलन पाटील :-**

महिला व बालकल्याण समितीचा विषय महासभेत घ्यायचा नाही असे सचिवांनी सांगावे.

**मा. सभापती :-**

या ठिकाणी महिला व बालकल्याण समितीच्या एकूण नऊ सन्मा. सदस्या आहेत. परंतु, ठरावामध्ये तीस महिला सदस्यांचा समावेश केलेला आहे. आपल्याकडे तीस महिला नगरसेविका आहेत का?

**ज्युडी डिसोझा :-**

आपल्याकडे तीस नगरसेविका आहेत.

**गजानन भोईर :-**

आपल्याकडे तीस महिला सदस्या आहेत.

**सुर्यकांत भोईर :-**

आपल्यकडे एकूण तीस नगरसेविका आहेत आणि ह्या ठरावात तीस नगरसेविकांबाबत लिहिलेले आहे.

**मा. सभापती :-**

बाहेरच्या लोकांना कशाल घेऊन जायचे?

**ज्युडी डिसोझा :-**

आपण बाहेरच्या लोकांना समाविष्ट करणार नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

या दौऱ्यासाठी कोणीही बाहेरचे लोक येणार नाहीत.

**कैलासबेन जानी :-**

या दौऱ्याला कुठलेही बाहेरचे नगरसेवक येणार नाहीत. या दौऱ्यासाठी इथलेच नगरसेवक येणार आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

इथे थोडी मिस अंडरस्टॅन्डीग झालेले आहे. या ठिकाणी इतर महिला सदस्या म्हणजे इतर नगरसेविका जाणार आहेत.

**मा. सभापती :-**

याचा अर्थ महानगरपालिकेच्या नगरसेविका या दौऱ्याला जाणार आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

या ठरावात एकूण तीस महिला सदस्या असून त्याच्यामध्ये महिला व बालकल्याण समितीच्या एकूण नऊ सन्मा. सदस्या आहेत. म्हणजे एकूण एकोणचाळीस सदस्या जाणार आहेत असा अर्थ होतो.

**प्रभात पाटील :-**

दौऱ्यासाठी तीस सदस्या म्हणजे तीस कुठल्या सदस्या आहेत?

**प्रेमनाथ पाटील :-**

या ठरावातील नऊ सदस्यांची संख्या काढायला पाहिजे.

**ज्युडी डिसोझा :-**

महिला व बालकल्याण समितीच्या नऊ सन्मा. सदस्यांचा समावेश करुन तीस सदस्या झालेल्या आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

परंतु, याचा बोलण्याचा अर्थ वेगळा होतो.

**मोहन पाटील :-**

महिला व बालकल्याण समितीच्या सदस्यांचासुध्दा त्याच्यामध्ये समावेश आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्ही एकूण तीस महिला सदस्या आहेत असे बोला.

**जयंत पाटील :-**

या ठरावामध्ये माझा असा विषय आहे की, महिला वबालकल्याण समितीच्या सन्मा. सदस्या आणि इतर सन्मा. सदस्या त्रिवेंद्रम, त्रिपुरम, कोचीन आणि कन्याकुमारीला जाणार आहेत. कारण तेथील महानगरपालिकेने विविध उपक्रम राबविलेले आहेत. परंतु, या देशातील कुठलीही महापालिका आमच्याकडे का येत नाही? आपल्या महानगरपालिकेने कुठलेही उपक्रम राबविलेले नाहीत का?

**प्रभात पाटील :-**

आपली महानगरपालिका नविन आहे. त्यामुळे आपण उपक्रम राबवू शकलो नाही. परंतु, आपण असे उपक्रम नक्कीच राबवूया.

**जयंत पाटील :-**

मा. पीठासीन अधिकारी, तुम्ही तिकडे उपक्रम बघायला चाललेले आहात की फिरायला चाललेले आहात? याचे प्रथम उत्तर द्या.

**मा. सभापती :-**

कोणी किती आभ्यास केला? आणि किती मागदर्शन केले? ते सगळ्यांना माहित आहे. ह्याच्यामध्ये प्रकरण क्र.१८ चा विषयसुध्दा घ्या आणि तो विषय पास करा.

**जुडी डिसोझा :-**

प्रकरण क्र.१८ च्या विषयाचा गोषवारा दिलेला नाही.

**मोहन पाटील :-**

मा. सभापती साहेबांनी प्रकरण क्र.१८ चा सुमोठा विषय घेतलेला आहे. जेव्हा मा. सभापती साहेब सुमोठा विषय घेतात तेव्हा त्या विषयाचा गोषवारा पाहिजेच असे काही नाही. माझ्या माहितीप्रमाणे या विषयाला गोषवाऱ्याची आवश्यकता नाही. आपण महिला व बालकल्याण समितीमार्फत तीस महिला सदस्यांची सहल आयोजित केलेली आहे. त्याचबरोबर आपल्या एका खर्चामध्ये दोन्ही गोष्टी होतील. म्हणजे स्थायी समितीच्या सदस्यानींसुध्दा दौऱ्याला जायला विषय घेतला तर तोसुध्दा विषय होऊन जाईल.

**जयंत पाटील :-**

आपल्याला रु. ७ लाखामध्ये दोन्ही खर्च करायचा आहे का?

**मोहन पाटील :-**

महिला व बालकल्याण समितीने आयोजित केलेला खर्च त्या समितीमार्फत केला जाईल.

**प्रेमनाथ पाटील :-**

म्हणजे हा रु. ७ लाख खर्च वेगळा झाला.

**मोहन पाटील :-**

महिला बालकल्याण समितीच्या सदस्यांचा खर्च अधिक इतर महिला सदस्यांचा खर्च असा एकूण खर्च होईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हा सर्व खर्च महानगरपालिकेच्या फन्डातुन होणार आहे. सन २००६-०७ च्या अंदाजपत्रकामध्ये रु. ५० लाखाची तरतुद दिलेली आहे. परंतु, ती तरतुद महिला व बालकल्याण समितीच्या अंदाजपत्रकामध्ये नाही.

**मोहन पाटील :-**

मी चुकीचे बोलत नाही. मी बरोबर बोलत आहे. महिला व बालकल्याण समितीच्या सदस्यांनी ह्याच्यामध्ये हा विषय घ्यायला नको होता. आपल्या सुवर्ण जयंती स्वयंरोजगार अंतर्गत ज्या काही स्कीम राबवायच्या आहेत त्याबाबत पैसे कमी पडतात. मागच्या वेळेला मी असताना ठराव केलेला होता. परंतु, त्यावेळेला बजेटमध्ये कमी तरतुद होती. परंतु, रु. १० लाखाचे अवलोकन होते. आपण त्यावेळेला लिमिटच्या बाहेर पैसे देऊन तो विषय पास केलेला होता. आपल्याला जनरल फन्डातुन पैसे घ्यायचे होते. परंतु, जनरल फन्डामध्ये फक्त रु. ३५ लाख आहेत. ते पैसे कमी आहेत. महिला व बालकल्याण समिती अंतर्गत तीस

महिलांना दौऱ्यासाठी घ्यावे असे स्वेच्छेने सांगितलेले असल्यामुळे तीस महिला सदस्या दौऱ्याला जातील आणि उरलेल्या महिला सदस्या जातील. ती वेगळी गोष्ट आहे.

**प्रभात पाटील :-**

ही शैक्षणिक सहल सर्व सन्मा. सदस्यांची असेल का?

**ज्युडी डिसोझा :-**

ह्या शैक्षणिक सहलीमध्ये सर्व नगरसेविका असणार आहेत का?

**प्रभात पाटील :-**

प्रथम मी विचारलेल्या शंकेचे निरसन करा. कारण मागच्या वेळेला असाच एक स्पेसिफिक विषय आलेला आहे. आता स्थायी समितीच्या दौऱ्याबाबत चर्चा करा. नंतर उरलेली चर्चा चालू ठेवा.

**मोहन पाटील :-**

महिला व बालकल्याण समितीने त्यांच्या फन्डातुन ठराव केलेला आहे.

**प्रभात पाटील :-**

तुम्ही या सहलीला शैक्षणिक सहल म्हणणार आहात का?

**मोहन पाटील :-**

आपण कुठेतरी एखादे प्रशिक्षण घेण्याच्या दृष्टीकोनातुन किंवा एखादी सिटी बघून त्याचे अवलोकन करायचे आहे. आपण मागच्या वेळेला बंगलोरला दौरा केलेला होता.

**प्रभात पाटील :-**

परंतु, बँगलोरचा दौरा स्थायी समितीमार्फत आयोजित केलेला होता. तो दौरा महिला व बालकल्याण समितीने आयोजित केलेला नव्हता.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेब, तुम्ही स्थायी समितीच्या दौऱ्याबाबत बोलता तर माझे असे मत आहे की इतर समित्यांनीसुध्दा दुसरीकडे दौरा काढू नये.

**मोहन पाटील :-**

इतर समितीच्या सन्मा. सदस्यांनी दौरा करावा असे माझे म्हणणे नाही.

**कैलासबेन जानी :-**

गेल्या वेळेला स्थायी समितीच्या सदस्यांनी दौरा केलेला होता.

**मोहन पाटील :-**

आपल्याकडे रु. ३५ लाखाची तरतुद आहे.

**ज्युडी डिसोझा :-**

स्थायी समितीचा एक अभ्यास दौरा ठेवा आणि जनरल दुसरा अभ्यास दौरा आयोजित करा.

**सुर्यकांत भोईर :-**

मा. सभापती महोदय, फक्त स्थायी समितीचा एक आभ्यास दौरा आयोजित करा.

**मा. सभापती :-**

आपण स्थायी समितीची शैक्षणिक सहल काढायची नाही. बाकीच्या समितीच्या सदस्यांना शैक्षणिक सहल काढायची असेल तर काढू दे. परंतु, आपण शैक्षणिक सहल काढायची नाही.

**प्रभात पाटील :-**

महिला व बालकल्याण समितीचा शैक्षणिक दौरा आणि स्थायी समितीचा शैक्षणिक दौरा दोन्ही जॉईन्ट करुन घ्या.

**ज्युडी डिसोझा :-**

दोन्ही दौरे जॉईन्ट करा.

**मा. सभापती :-**

महिला व बालकल्याण समितीचा आणि स्थायी समितीचा दौरा हे दोन्ही दौरे जॉईन्ट करण्याची गरज नाही. आपण या दौऱ्याच्या खर्चाला मंजुरी घेऊया.

**केशव घरत :-**

मा. सभापती महोदय, महिला व बालकल्याण समितीच्या सन्मा. सदस्या त्यांची सेपरेट सहल काढू शकतात. मग आपण आपली सहल सेपरेट काढू शकत नाही का?

**मोहन पाटील :-**

आपण आपली सेपरेट सहल काढू शकतो.

**सुर्यकांत भोईर :-**

मग तुम्ही सेपरेट सहल का काढत नाही?

**केशव घरत :-**

मा. सभापती महोदय, आपण महिला व बालकल्याण समितीच्या सन्मा. सदस्यांना परमिशन देतो आणि आपणच आपली सहल काढत नाही.

**सुर्यकांत भोईर :-**
आपण स्थायी समितीची सहल काढलेली नाही.
**मा. सभापती :-**
महिला व बालकल्याण समितीचा विषय झालेला आहे. आपण स्थायी समितीचा विषय नंतर घेऊया.
**मोहन पाटील :-**
आपण प्रकरण क्र. १८ चा विषयसुध्दा आताच घेऊया.
**मा. सभापती :-**
ह्या विषयामध्ये तो विषय मिक्स करुन घेऊ नका. आपण स्थायी समितीचा विषय वेगळा घेऊया.
**मोहन पाटील :-**
विषय मिक्स करण्याचा प्रश्न येत नाही. तुमचा विषयाचा क्रम बदलण्याचा अधिकार आहे. आता दौऱ्याबाबतचा विषय चालू असल्यामुळे दोन्ही विषयावर आताच चर्चा होऊन जाईल. त्यामुळे आता प्रकरण क्र. १८ चा विषय घेण्यात यावा.
**मा. सभापती :-**
आपल्याला या विषयामध्ये फक्त दौऱ्याला लागणाऱ्या खर्चाची मंजुरी घ्यायची आहे.
**मोहन पाटील :-**
आता प्रकरण क्र. १८ चा विषयसुध्दा घ्या. म्हणजे आताच प्रकरण क्र.१८ च्या विषयावर चर्चा होऊन जाईल.
**नगरसचिव :-**
प्रकरण क्र. ११ चा विषय मंजुर झालेला आहे.
**प्रभात पाटील :-**
महिला व बालकल्याण समितीचा आभ्यास दौरा आणि इतर सर्व समित्यांचे आभ्यास दौरे हे सर्व मर्ज करा.
**ज्युडी डिसोझा :-**
तुम्ही सगळ्या समित्यांचे आभ्यास दौरे मर्ज करा.
**मोहन पाटील :-**
स्थायी समितीच्या अभ्यास दौऱ्याचा वेगळा विषय घ्या.
**सुर्यकांत भोईर :-**
स्थायी समितीच्या अभ्यास दौऱ्याचा वेगळा विषय घ्या.
**प्रभात पाटील :-**
स्थायी समितीच्या अभ्यास दौऱ्याचा वेगळा विषय घ्या.
**ज्युडी डिसोझा :-**
स्थायी समितीच्या अभ्यास दौऱ्याचा वेगळा विषय घ्या.
**मोहन पाटील :-**
आपण स्थायी समितीच्या अभ्यास दौऱ्यासाठी रु. ९ लाख खर्च करणार असल्यामुळे स्थायी समितीच्या आभ्यास दौऱ्याचा विषय वेगळा घ्यावा लागेल.
**सुर्यकांत भोईर :-**
सगळ्या समित्या दौरे काढतात. परंतु, स्थायी समितीने कुठलाही दौरा काढलेला नाही. त्यामुळे तुम्ही स्थायी समितीचा वेगळा विषय घ्या. आम्ही त्या विशयाला मंजुरी देतो.
**मोहन पाटील :-**
आपल्या मा. उपायुक्त साहेबांनी मला असे सांगितले की केरळला फार गर्मी आहे. त्यामुळे तुम्ही कलकत्ता साईडला दौरा ठेवा.
**सुर्यकांत भोईर :-**
कलकत्ता साईडलासुध्दा खुप गर्मी आहे.
**ध्रुवकिशोर पाटील :-**
आता समरचा सीजन आहे. त्यामुळे दार्जिलिंग, कुलु-मनाली सारख्या थंड हवेच्या ठिकाणी दौरा आयोजित करायला हवा.
**गजानन भोईर :-**
आपण स्थायी समितीचा दौरा अंदमान-निकोबारला ठेवूया.
**सुर्यकांत भोईर :-**
स्थायी समितीचा दौरा दार्जिलिंगला ठेवा.
**गजानन भोईर :-**
तुम्ही कुलु-मनालीला अभ्यास दौरा घ्या.

**प्रभात पाटील :-**

आपल्याला अभ्यास दौरा करायचा आहे म्हटल्यावर आपण तेथील स्थानिक प्राधीकरणाशी संपर्क साधणे आवश्यक आहे.

**रतन पाटील :-**

तुम्ही फक्त खर्चाला मंजुरी घ्या. दौरा कुठे काढायचा ते नंतर बघूया.

**मा. सभापती :-**

आपण प्रथम खर्चाला मंजुरी देऊया आणि दौरा कुठे काढायचा ते नंतर बघूया.

**मोहन पाटील :-**

तुम्ही अंदाजे किती खर्चाला मंजुरी देणार?

**मा. सभापती :-**

जो काही खर्च येईल आम्ही तेवढ्या खर्चाला मंजुरी देऊ.

**प्रभात पाटील :-**

तुम्ही स्थायी समीतीला येणाऱ्या खर्चाला मंजुरी द्या.

**सुर्यकांत भोईर :-**

स्थायी समितीच्या खर्चाची मंजुरी सेपरेट घ्या.

**प्रभात पाटील :-**

परंतु, आता त्या ठरावात बदल होईल.

**गजानन भोईर :-**

स्थायी समितीचा दौरा अंदमान-निकोबारला घ्या.

**सुर्यकांत भोईर :-**

स्थायी समितीचा दौरा अंदमान-निकोबारला घ्या.

**मोहन पाटील :-**

आपला अंदमान-निकोबारचा खर्च वेगळा राहिल. आपण आधी ठरवले तरी आपल्याला एक महिना अगोदरच तिकिटे घ्यावी लागतील.

**मा. सभापती :-**

आपण ह्याच महिन्याच्या शेवटी दौरा घेऊया.

**ज्युडी डिसोझा :-**

महिला वबालकल्याण समितीच्या दौऱ्याचा विषय मंजुर झाला आहे का?

**मा. सभापती :-**

महिला व बालकल्याण समितीच्या विषयाला आणि प्रकरण क्र.१८ च्या खर्चाला मंजुरी दिलेली आहे.

**मोहन पाटील :-**

प्रकरण क्र. ११, शैक्षणिक दौऱ्यावर विचार विनिमय करणे. त्या ठिकाणी शैक्षणिक दौरा न उल्लेख करता अभ्यास दौरा असा उल्लेख करण्यात यावा. यासाठी सभागृहाने मंजुरी दिलेली आहे आणि मा. सभापती महोदयांनी रुलिंग दिलेले आहे.

**प्रकरण क्र. ११ :-**

महिला व बालकल्याण समिती सदस्यांचा केरळ राज्यातील महानगरपालिका अभ्यास दौऱ्याबाबत. (मा. महिला व बालकल्याण समितीने शिफारस केलेले प्रकरण क्र. ०२)

**ठराव क्र. १२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेत एकुण ३० महिला नगरसेविका असून त्यामध्ये महिला व बालकल्याण समितीच्या ९ सदस्या आहेत. केरळ राज्यातील त्रिवेंद्रम, त्रिचुर, कोचीन महानगरपालिकेने महिला व बालकांसाठी विविध उपक्रम राबविलेले असून तेथील समित्यांचे उत्कृष्ठ काम व त्यांनी राबविलेल्या कार्यक्रमांची माहिती घेण्यासाठी महानगरपालिकेतील महिला व बालकल्याण समितीच्या सदस्या व इतर महिला नगरसेविका यांचा केरळ राज्यातील वरील महानगरपालिकांचा अभ्यास दौरा आयोजित करावयाचा आहे. त्यासाठी अंदाजे रु. ७ लाख एवढा खर्च अपेक्षित आहे. महिला व बालकल्याण समितीसाठी सन २००६-०७ वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये ५० लाख एवढी तरतुद आहे. तरी सदरचा दौरा आयोजित करणेस ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**सुचक :- सौ. ज्युडी डिसोझा.** **अनुमोदन :- श्री. मिलन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिव ह्यांनी प्रकरण क्र. १२ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य मिलन पाटील ह्यांनी ठरावाचे वाचन केले)

**सुर्यकांत भोईर :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. १२ :-**

महानगरपालिका क्षेत्रातील आर्थिकदृष्ट्या गरिब व गरजु मुला-मुलींना महिला व बालकल्याण समितीच्या निधीतून विविध व्यवसायाचे प्रशिक्षण देण्याबाबत. (मा. महिला व बालकल्याण समितीने शिफारस केलेले प्रकरण क्र. ०३)

**ठराव क्र. १३ :-**

महानगरपालिका क्षेत्रातील आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या गरजु मुला-मुलींसाठी महिला व बालकल्याण समितीच्या निधीमधून लघुउद्योग (अगरबत्ती, मेणबत्ती, खडू, साबण बनविणे, सॉफ्ट डाईज, फ्लॉवर मेकींग, सिरॅमिक, संगणक, वाहनचालक, शिलाई मशिन, ब्युटीपार्लर, इलेक्ट्रीशन व इतर सर्व प्रकारचे प्रशिक्षण द्यावयाचे आहे. सदर प्रशिक्षणासाठी नगरसेवक, नगरसेविकांचे पत्र येतात.

सदर प्रशिक्षणासाठी एका लाभार्थ्यांवर शासनाच्या आदेशाप्रमाणे रु. २०००/- एवढा खर्च अपेक्षित आहे. सन २००६-२००७ या आर्थिक वर्षात प्रशिक्षणावर एकूण रु. २०/- लाख एवढा खर्च अपेक्षित आहे. सन २००६-२००७ या आर्थिक वर्षासाठी अंदाजपत्रकामध्ये रु. ५०/- लाख एवढी तरतुद असून ४३/- लाख शिल्लक आहे. तरी २००६-०७ या आर्थिक वर्षात गरीब व गरजू लाभार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी सुवर्ण जयंती रोजगार अंतर्गत देण्यात येणाऱ्या संस्थेमार्फत प्रशिक्षण देण्यांत यावे व येणाऱ्या खर्चास ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. मिलन पाटील.** **अनुमोदन :- श्री. सुर्यकांत अ. भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिव ह्यांनी प्रकरण क्र. १३ चे वाचन केले.)

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. सभापती महोदयांच्या परवानगीने बोलतो की, हा विषय स्थायी समितीसमोर आणण्याचे असे कारण आहे की जकात विभागाचा ठेका निश्चित करुन जी अंमलबजावणी करण्यात येत आहे. ते ठेकेदार कोणार्क इन्फ्रा. प्रा. लि. यांनी २६ जुलै २००५ रोजी जी अतिवृष्टी झालेली होती. त्या दरम्यान जकात वसुलीच्या विक्रीवर परिणाम होऊन त्यांचे नुकसान झाले म्हणून त्यांनी आपल्याकडे काही पैशाची मागणी केलेली होती. त्याच्या वसुलीचा इष्टांक पूर्ण न होता, आलेल्या नुकसानाच्या अनुषंगाने प्रशासनाकडून आवश्यक त्या हेरिंग घेण्यात आलेल्या होत्या आणि आपण त्यांच्या बरोबर जो करारनामा केलेला होता. त्या करारनाम्याचा क्लॉज नं. २२ प्रमाणे त्याच्यामध्ये कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई देण्याची तरतुद नाही. उत्पन्न कमी-जास्त झाले तरी त्यांनी आपला रेग्युलर हप्ता भरणे अपेक्षित आहे. वास्तविक ते सगळे हप्ते रेग्युलर भरत आहेत. आपण आपल्या क्लॉजप्रमाणे त्यांची मागणी फेटाळून लावलेली होती. आपण त्यांची मागणी फेटाळल्यानंतर त्यांनी महाराष्ट्र शासनाकडे म्हणजेच आर्बिटेटरकडे या प्रकरणाचे अपिल केलेले आहे आणि त्यांनी त्यांची मागणी ठाम मांडलेली आहे. या प्रकरणामध्ये आर्बिटेटर हे प्रधानसचिव साहेब आहेत. प्रधानसचिव साहेब कामामध्ये व्यस्त असल्यामुळे याच्यामध्ये आर्बिटेटर हे इतर आयुक्त किंवा शासनाचे सहसचिव असावेत असे आपल्याला शासनाने एक संमतीपत्र पाठविलेले होते. त्या अनुषंगाने त्याला ठेकेदारानेसुध्दा मान्यता दिलेली आहे. आपल्या ॲग्रीमेन्टप्रमाणे याच्यामध्ये जे काही वाद होतील. त्याच्या आर्बिटेटरचे चेअरमन प्रधानसचिव होते. त्याऐवजी सहसचिव राहण्यासाठी आपली हरकत नसावी यासाठी शासनाने मिरा भाईंदर महानगरपालिकेला पत्र पाठविलेले आहे. तुम्हाला या प्रकरणाची वस्तुस्थिती माहिती असावी. हे प्रकरण काय आहे? याबाबत भविष्यात वाद होऊ नयेत. हे प्रकरण फायनान्शियल मॅटरचे असल्यामुळे आपल्यासमोर हा विषय मान्यता आणि अवलोकनासाठी सादर केलेला आहे. आपण त्याची मागणी डिनाय केल्यानंतर त्यांनी शासनाकडे अप्रोच केलेला आहे. या प्रकरणात शासन निर्णय घेईल आणि तो निर्णय महासभेला पुन्हा सादर केला जाईल. वास्तविक तो निर्णय आपल्याकडून लागला तर इश्यु निर्माण होत नाही. तो निर्णय आपल्य विरोधात लागला तर आपल्याला हायकोर्टात अपिल दाखल करता येईल.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब, तुम्ही अवलोकनाचा विषय आणलेला आहे. परंतु, अवलोकनाचे रु. १० लाखापर्यंतचे विषय असतात.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्ही शेवटची लाईन वाचा. सदर संदर्भात निर्णय होणेकामी असे शेवटी लिहलेले आहे. त्याचा काय अर्थ होतो?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्याला शासनाने सहसचिव प्रधानसचिवांच्या ऐवजी आर्बिटेटर राहतील असे कळविलेले आहे. त्याला स्थायी समितीची मान्यता असावी. इन केस आपण ह्याच्यामध्ये मान्यता दिली नाही तरी शासन ह्याच्यामध्ये निर्णय घेते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही त्याला ऑलरेडी मान्यता दिलेली आहे. तुम्ही तुमचे पत्र बघा. याच्यामध्ये असे म्हटलेले आहे की महानगरपालिकेने शासनास लिहलेले पत्र मनपा/जकात/४२-२००७/ दि. १७/४/२००६ सदर वादासंदर्भात निर्णय घेण्याच्या अनुषंगाने प्रधान सचिव-२ ऐवजी शासनाचे सहसचिव किंवा अन्य महानगरपालिकेचे आयुक्त यांची नियुक्ती केल्यास त्यास मनपाची संमती राहिल असे कळविण्यात आलेले आहे. म्हणजे तुम्ही तुमची संमती ऑलरेडी दर्शविलेली आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

शासनाने त्याच्यामध्ये मा. आयुक्त साहेबांची संमती सांगितलेली होती. प्रधानसचिव व्यस्त असल्यामुळे किंवा प्रधानसचिवांच्याऐवजी इतर महानगरपालिकांचे आयुक्त किंवा ह्याच्यामध्ये शासनाने सहसचिव आर्बिटेटर असले तर तुम्ही तुमचे अभिप्राय कळवावेत असे आयुक्तांचे मत मागविलेले आहे. आयुक्तांनी ते मत कळविलेले होते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मग तुम्ही हा विषय आता निर्णयासाठी का आणला? तुम्ही हा विषय आधीच निर्णयासाठी आणला असता तर स्थायी समितीमध्ये पास केला असता.

**रतन पाटील :-**

साहेब, हा विषय इकडे उशीराच आलेला आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आम्ही तुमच्यावतीने प्रशासकीय कामकाज करित आहोत.

**गजानन भोईर :-**

श्री. खतगावकर साहेब, आपण लोकांना नुकसान भरपाई दिलेली नाही. भाईंदरचे नुकसान झालेले नाही असे कलेक्टर साहेब आणि शासनाने सांगितलेले आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण कोनार्क इन्फ्रा. प्रा. लि.चे म्हणणे मान्य न करता त्यांची मागणी फेटाळली आहे. आपण आणि प्रशासन वेगळे नाही. आपण स्थायी समितीच्यावतीने काम करित आहोत. परंतु, ते काम होत असताना राहू नये म्हणून हा विषय ऑलरेडी अवलोकनासाठी आणलेला होता. हे पत्र दरम्यानच्या काळात आलेले आहे. आम्ही हा विषय पूर्वीच दिलेला होता. हा विषय आल्यामुळे दुसरा विषय आलेला नाही असे नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आम्हाला तुमच्याबद्दल संशय नाही. परंतु, निर्णय होणे कामी स्थायी समितीस सादर असे तुमचेच म्हणणे आहे. दुसरे म्हणजे तुम्ही घेतलेला निर्णय आम्हाला मान्य आहे. असे महानगरपालिकेने शासनाला पत्र दिलेले आहे. जर मान्य आहे असे आयुक्त साहेबांना कळविले असेल तर स्थायी समितीने त्याच्यामध्ये बदल का केला? जर तुम्ही अहवाल सादर करुन आमचा निर्णय घेतला असता तर वेगळी गोष्ट होती.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी खुलासा करु इच्छितो की आर्बिटेटरचे आदेश शासन काढेल अशी आमची अपेक्षा होती. हे प्रकरण आपले असल्यामुळे व आपल्याला सहसचिव मान्य असल्यास महापालिकेने त्याचे आदेश निर्गमित करावेत असे शासनाचे पत्र आलेले आहे. असा आदेश निर्गमित करण्यापूर्वी स्थायी समितीच्या मान्यतेची अपेक्षा आहे. म्हणून आम्ही हे वाक्य टाकलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, हे याच्या अगोदर व्हायला पाहिजे.

**रतन पाटील :-**

साहेब, प्रधान सचिवांना अजिबात वेळ मिळालेला नाही का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

प्रधान सचिवांना वेळ मिळालेला नाही असे तुम्ही कमेन्ट्स करु शकत नाही.

**रतन पाटील :-**

प्रधान सचिवांची एकदा मिटींग झाल्यानंतरसुध्दा त्यांना वेळ मिळालेला नाही. मग सहसचिव कशाला घेतलेले होते?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण शासनाला असे बोलू शकत नाही. याठिकाणी वेळेचा मुद्दा नाही.

**रतन पाटील :-**

तुम्हाला सहसचिव नियुक्त करताना अटीशर्तीमध्ये बदल करावा लागेल.

**प्रभात पाटील :-**

परंतु, आता आहेत त्याच अटीशर्ती आहेत. अजुन अटीशर्ती कशाला पाहिजेत? आपल्या अटीशर्तीमध्ये जे काही मेन्शन केलेले आहे त्यानुसार आपण फेटाळलेले आहे. आम्ही आज याच मुद्यावर ठाम राहू की, आमच्या अटीशर्तीमध्ये जे काही आहे आम्ही त्याच्याशी सहमत राहू. सहसचिवांना नियुक्त करणे आणि त्यांना सहमती देणे हे आम्हाला आता जमणार नाही.

**रतन पाटील :-**

मिरा भाईंदरचा एकही पैसा दिला जाणार नाही.

**मिलन पाटील :-**

मा. सभापती महोदयांच्या परवानगीने बोलतो की भिवंडी-निजामपुर नगरपालिकेची सेम केस होती. त्यांनी रु. ७ करोडची मागणी केलेली होती. ते रु. ७ करोड द्यायची अशी शासनाने मंजुरी दिलेली होती. परंतु, श्री. शिवमुर्ती नाईक साहेबांनी ते सर्व नाकारले होते. श्री. नाईक साहेबांनाी आदेशसुध्दा नाकारला होता. ते कोर्टामध्येसुध्दा गेलेले होते. आपण ह्या प्रकरणाला ह्याला मंजुरी देऊ शकत नाही असे त्यांचे म्हणणे होते.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्याला शासनाने पैसे द्या असे आदेश दिलेले नव्हते.

**मिलन पाटील :-**

शेवटी सुप्रीम कोर्टात गेल्यानंतर सुप्रीम कोर्टाने आदेश दिले की, आयुक्त साहेब बोललेले बरोबर आहे. शासन बोललेले बरोबर नाही. त्यामुळे आपण पैसे देऊ शकत नाही, असा सुप्रीम कोर्टाचा निर्णय आहे. आपण त्यांना पैसे का देऊ शकत नाही?

**गजानन भोईर :-**

साहेब, अवलोकन म्हणजे काय? ते प्रथम सांगा. हा विषय अवलोकनार्थ आलेला असल्यामुळे अवलोकन म्हणजे काय? हे कळणे आवश्यक आहे.

**रतन पाटील :-**

मा. सभापती महोदय, तुम्हाला या विषयासाठी स्थायी समितीमध्ये मान्यता घ्यावी लागेल.

**मोहन पाटील :-**

मी मा. सभपती महोदयांच्या परवानगीने बोलतो की सन २००५-०६ सालातील जकात वसुलीबाबत आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका व मे. कोणार्क इन्फ्रा. प्रा. लि. यांच्यातील वादाबाबत केलेल्या कार्यवाहीबाबत मा. स्थायी समितीपुढे सादर असा विषय या ठिकाणी आलेला आहे. मा. उपायुक्त साहेब, हे ऐवढे बरोबर आहे. परंतु, खाली लिहलेले आहे की सदर संदर्भात अवलोकन होऊन निर्णय होणेकामी स्थायी समितीसमोर सादर. आम्ही येथील निर्णय होणेकामी शब्दप्रयोग काढून टाकतो. कारण आम्ही तुम्हाला फक्त निर्णय देणार आहोत. जेव्हा तुम्ही एखादा विषय तुमच्या अखत्यारित असतात आणि नंतर आमच्याकडे ते विषय अवलोकनार्थ येतात. आम्ही निर्णय होणेकामी हा शब्दप्रयोग काढून टाकतो. तुम्ही हा विषय अवलोकनार्थ द्या.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील यांचे म्हणणे एकदम बरोबर आहे.

**मिलन पाटील :-**

जर आपण हा विषय पास केला तर आपण कोर्टाच्या पुढचे कायदेतज्ञ झालो.

**जयंत पाटील :-**

आपण हा विषय पास केलेला नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हा विषय पास करण्याचा प्रश्नच येत नाही.

**मिलन पाटील :-**

शासनाचा आदेश असा आहे की त्या ठेकेदाराल नुकसान भरुन दिलेले नाही.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील, हा विषय कोणीही पास केलेला नाही.

**मोहन पाटील :-**

परंतु, हा विषय अवलोकनार्थ आणलेला आहे.

**जयंत पाटील :-**

जर कोणार्क इन्फ्रा. प्रा. लि.ची पत्रे त्यावेळेला आलेली असतील तर तुम्ही त्यावेळेच्या स्थायी समितीमध्ये हा विषय आणायला पाहिजे होता. कोणार्क इन्फ्रा. प्रा. लि.ने त्यांची मागणी केलेली आहे. तुम्ही

त्यांच्यांशी परस्पर चर्चा करुन लिहून घेतले व नंतर शासनाकडे गेलेले आहात. हा विषय शासनाकडे गेल्यानंतर उपप्रधान सचिवांकडे जाणार असल्यामुळे तुम्ही हा विषय स्थायी समितीसमोर आणलेला आहे. एवढा मोठा पैशाचा हिशोब आणि मोठी रक्कम असणे ही साधी गोष्ट नाही. जर महानगरपालिकेच्या पैशाची अशात-हेने वाट लागत असेल तर तुम्ही हा विषय तेव्हाच स्थायी समितीपुढे आणायला पाहिजे होता. कोणार्क इन्फ्रा. प्रा. लि.वाल्यांचा विषय स्थायी समितीने महासभेसमोर आणायला पाहिजे होता. तुम्ही आता अवलोकनार्थ हा शब्द वापरता याचा अर्थ तुम्ही तो विषय फक्त बघायला आणि आमच्यासमोर सादर करायचा असे कधीही होत नाही.

**मोहन पाटील :-**

त्यांनी ह्या विषयात निर्णय होणेकामी असा शब्दप्रयोग केलेला आहे. तो शब्दप्रयोग वगळणे आवश्यक आहे.

**जयंत पाटील :-**

मुळात याठिकाणी आयुक्तांतर्फे असे लिहलेले आहे. अन्य महापालिकेचे आयुक्त यांची सदर संदर्भात नियुक्ती करण्याबद्दल आमची अशी मागणी होती की त्यावळेला श्री. शिवमुर्ती नाईक साहेबांचीच निवड करण्यात यावी. आपल्याकडे त्यांच्यासारखी जबाबदार आणि कणखर व्यक्ती होती. शिवाय, त्यांनी आपल्याकडे काम केलेले आहे. त्यामुळे तुम्ही त्यांची नियुक्ती केली असती तर त्यांनी कोणार्क इन्फ्रा. प्रा. लि.वाल्यांचा निकाल लावला असता. मघाशी सन्मा. सदस्य मिलन पाटील यांनी सांगितले की कोणार्क इन्फ्रा. प्रा. लि. वाल्यांचा निर्णय सुप्रीम कोर्टापर्यंत गेलेला आहे आणि त्यांनी पाहणी करुन दिलेले आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्याला सुप्रीम कोर्टात जाण्यासाठी कोणीही परावृत्त केलेले नाही. त्यामुळे आपल्याला सुप्रीम कोर्टात जाता येते. आता या ठिकाणी अमाऊन्टचा इश्यु येत नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, आता अमाऊन्टचाच इश्यु उत्पन्न झालेला आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आता अमाऊन्टचा इश्यु कुठे आहे?

**प्रेमनाथ पाटील :-**

जर आपण आता कोणार्क इन्फ्रा. प्रा. लि. वाल्यांना मान्यता दिली तर कोणाचे पैसे जाणार आहेत? ते बघा.

**रतन पाटील :-**

साहेब, तुम्ही निर्णय झाल्यानंतर कोणार्क इन्फ्रा. प्रा. लि. वाल्यांना काहीतरी अमाऊन्ट द्यावीच लागणार आहे. त्यामुळे या ठिकाणी अमाऊन्टचाच इश्यु आहे.

**मिलन पाटील :-**

ह्याच्यामध्ये प्रशासनाची काय भुमिका आहे?

**रतन पाटील :-**

साहेब, हा अमाऊन्टचा इश्यु नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुम्ही प्रथम आम्हाला समजुन घ्या आणि नंतर पुढचे विषय मांडा. आपले जकात ठेकेदारासोबत जे काही ॲग्रीमेन्ट झालेले आहे. ते ठेक्याच्या तरतुदीप्रमाणे झालेले आहे. परंतु, जुलै महिन्यामध्ये अतिवृष्टीमुळे जकात ठेकेदराचे जे काही उत्पन्नामध्ये आर्थिक नुकसान झालेले होते.

**सुर्यकांत भोईर :-**

जकात ठेकेदाराचे आर्थिक नुकसान झालेले नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

जकात ठेकेदाराचे आर्थिक नुकसान झालेले होते हे आपण मान्य केलेले नाही. आपण फक्त आर्थिक नुकसानाची मागणी केलेली आहे. आपल्याकडे ती मागणी प्रलंबित होती. मी इकडे जॉईन्ट झाल्यानंतर त्यांच्याशी दोन हेरिंग केलेले होते. जकात ठेकेदारासोबत दोन हेरिंग केल्यानंतर आपण त्यांना निर्णय कळविणे आवश्यक आहे. जर ही बाब जकात ठेकेदाराला अनुज्ञेय होण्यासारखी असती तर ते मॅटर निश्चितपणे आपल्यासमोर आले असते आणि आम्ही ह्याच्याबद्दल धोरणात्मक निर्णय होण्यासाठी शिफारस केली असती. प्रशासनाने जकात अभिकर्त्याची मागणी तत्वतः फेटाळलेली होती. जकात अभिकर्त्याला कुठलीही मागणी देता येत नाही असे आम्ही दि. १०/०२/२००६ रोजी लेखी कळविलेले आहे. आम्ही तुम्हाला हे पत्र वाचून दाखवतो.

**रतन पाटील :-**

साहेब, तुमचे म्हणणे बरोबर आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

प्रशासन काहीतरी वेगळे सांगते आणि आम्ही काहीतरी वेगळे सांगतो असे काही नाही. आम्ही जकात अभिकर्त्याची संपूर्ण मागणी फेटाळलेली आहे. मागणी फेटाळल्यानंतर जकात अभिकर्त्याच्या ॲग्रीमेन्टमध्ये जो

काही क्लॉज आहे. त्याबाबत जकात अभिकर्त्याने शासनाकडे अपिल केलेले आहे. आपण क्लॉज नं.२२ प्रमाणे त्याची मागणी फेटाळलेली आहे. त्याच्यामध्ये जकात अभिकर्त्याचे कुठल्याही प्रकारचे कम्पेन्सेशन किंवा जकात अभिकर्त्याला कुठल्याही त-हेचे नुकसान करण्याची तरतुद नाही. त्यामुळे तुमची कुठलीही मागणी विचारात घेता येत नाही असे आम्ही जकात अभिकर्त्याला लेखी कळविलेले आहे. कोणार्क इन्फ्रा. प्रा. लि.चे प्रतिनिधी त्या आदेशाच्या विरोधात शासनाकडे असलेल्या आर्बिटेटरच्या तरतुदीनुसार प्रधान सचिवांकडे अपिल केलेले आहे. त्या अपिलच्या दरम्यान एक सुनावणी झालेली होती. मा. सी.एम. साहेबांच्या अधिवेशन काळामध्ये आणि मा. प्रधानसचिवांना ब्रिफिंग करणे असल्यामुळे ती सुनावणी होऊ शकलेली नाही. दरम्यानच्या काळात मा. आयुक्तांना शासनाने पत्र लिहलेले होते. मी त्या पत्राचे वाचन करतो. (मा. आयुक्तांना शासनाने पाठवलेल्या पत्राचे वाचन केले.) मा. आयुक्तांनी दि. १७/४/२००६ रोजी शासनास पत्र लिहिलेले आहे. मी त्या पत्राचे वाचन करतो. :- संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने व संदर्भाने कोणार्क इन्फ्रा. प्रा. लि. यांच्यातील वाद प्रधानसचिव - २, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे आहे. तथापी आपण वरिल पत्राने कळविल्याप्रमाणे दोन्ही पक्षातील वादा संदर्भात निर्णय घेण्यासाठी प्रधानसचिव - २ ऐवजी शासनाचे सहसचिव किंवा अन्य महापालिकेचे आयुक्त यांची नियुक्ती केल्यास आमची संमती राहिल. म्हणजे आधी सहसचिव करा किंवा आयुक्त करा असे नाही. ह्याच्यामध्ये शासनाने निर्णय घ्यावा असे आम्ही कळविलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही काम केलेले आहे ते बरोबर केलेले आहे. परंतु, तुम्ही या ठिकाणी चुकत आहात.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

या ठिकाणी मा. आयुक्तांचेच अभिप्राय मागविलेले होते. परंतु, जर त्यांनी महापलिकेचे अभिप्राय मागविलेले असते तर आम्ही महापालिका असे ठेवले असते. त्यांनी आपले अभिप्राय असे म्हटलेले होते. म्हणून आपण याचा निर्णय घ्यावा असे आयुक्तांनी कळविलेले आहे.

**जयंत पाटील :-**

आपण निर्णय घ्यावा असे असले तरी रु. १ कोटी ६२ लाखाचा प्रश्न आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

याच्यामध्ये आमचेसुध्दा काहीही चुकलेले नाही. तुम्ही जे निर्णय देता आम्ही त्या निर्णयाची शासनाकडे अंमलबजावणी करायला लावतो. आपल्यावर काहीतरी लादले जात आहे असा गैरसमज करुन घेऊ नका. तुम्ही आता या घटकेला जो काही निर्णय द्याल त्याची अंमलबजावणी केली जाईल. सन्मा. सदस्य मिलन पाटील म्हणतात की तुम्ही ह्याची-त्याची नियुक्ती करता? असे कुठलेही काहीही नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

परंतु, सहसचिव आयुक्त साहेब असतील ना.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आज स्थायी समितीचे सभागृह जे काही ठरवेल आपण त्याची अंमलबजावणी करण्याची शासनाकडे विनंती करु.

**मिलन पाटील :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो की कोणार्क इन्फ्रा. प्रा. लि.ने मागितलेला डिफरन्स हा भाव फरकाचा आहे. जकात अभिकर्त्याने कसल्या नुकसानाची भरपाई मागितलेली आहे?

**जयंत पाटील :-**

ज्या दिवसापासू नुकसान झालेले आहे. त्याचा डिफरन्स मागितलेला आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

अतिवृष्टीमध्ये आलेल्या नुकसानाची भरपाई मागितलेली आहे.

**मिलन पाटील :-**

हा डिफरन्स कशाला मागितलेला आहे?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

कोणार्क इन्फ्रा. प्रा. लि.ला जे उत्पन्न अपेक्षित होते. ते उत्पन्न मला मिळालेले नाही असे त्यांचे म्हणणे आहे.

**जयंत पाटील :-**

कोणार्क इन्फ्रा. प्रा. लि.चे उत्पन्न दिवाळीमध्ये वाढले असते तर आपण त्याला जास्त उत्पन्न दिले असते का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

म्हणून आपण त्यांचे उत्पन्न रिजेक्ट केलेले आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

आम्हाला कोणार्क इन्फ्रा. प्रा. लि. वाल्याला नुकसान भरपाई द्यायची नाही.

**मिलन पाटील :-**

साहेब, तुमची दिशाभुल होत असेल. कोणार्क इन्फ्रा. प्रा. लि.ला टेन्डर मिळाल्यानंतर आपण त्याला त्याचे भाव फलक दिलेले होते. आपण त्याला अमुक-अमुक रेट देऊन दहा-पंधरा दिवसांनी ते रेट वाढविलेले होते आणि काही रेट कमी केलेले होते. कोणार्क इन्फ्रा. प्रा. लि.ने वाढविलेल्या रक्कमेचे कॅल्क्युलेशन न करता कमी केलेल्या रक्कमेचे कॅल्क्युलेशन केलेले होते. त्याच्यामध्ये औषधे वगैरे सारख्या ब-याच गोष्टीचा समावेश आहे. ह्या सर्व गोष्टी अमुक-अमुक दिवसांमध्ये एवढ्या-एवढ्या येणे अपेक्षित होत्या. त्या आलेल्या नसल्यमुळे मला या डिफरन्समध्ये लॉस झालेला आहे. त्याची कोणार्क इन्फ्रा. प्रा. लि.ने मागणी केलेली आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

तुम्ही म्हणता ती वस्तुस्थिती असेल. परंतु, कोणार्क इन्फ्रा. प्रा. लि.ने तशी मागणी केलेली नाही.

**रतन पाटील :-**

महापालिकेने तो डिफरन्स दिलेला आहे.

**मिलन पाटील :-**

कोणार्क इन्फ्रा. प्रा. लि.ने डिफरन्सची मागणी केलेली असेल आणि भाव वाढल्याचे सांगितले नसेल. त्यांनी आपल्याकडे भाव कमी केल्याची मागणी केली असेल. त्यांना लेखाधिका-याकडे पत्र दिले. लेखाधिका-याने ते पत्र दाबुन ठेवलेले होते. कोणार्क इन्फ्रा. प्रा. लि. वाल्यांनी लेखाधिका-याला दोन वेळा पत्र देऊन्सुध्दा त्यांनी ते पत्र आम्हाला दाखविलेली नाही., आयुक्त साहेबांना दाखविलेले नाही आणि स्थायी समितीसमोरसुध्दा ते पत्र आलेले नाही. महानगरपालिकेला हा फटका लेखाधिका-यामुळे बसलेला आहे. त्यांनी पत्र दिलेले नाही.

**केशव घरत :-**

परंतु, आपल्याला कोणार्क इन्फ्रा. प्रा. लि.ला नुकसान भरपाई द्यायची नाही. मग वाद कशाला घालायला पाहिजे.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपल्याला कोणार्क इन्फ्रा. प्रा. लि.ला पैसे द्याचे नाहीत.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील, आपण लेखाधिका-याला नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न येत नाही. आपण शेवटच्या क्षणापर्यंत जकात अभिकर्त्याला भाडू.

**जयंत पाटील :-**

आम्ही या विषयावरती ठराव मांडतो.

**मिलन पाटील :-**

ह्याच्यामध्ये असे लिहलेले आहे की दि. १३/०२/२००६ रोजीच्या पत्रानुसार कोणार्क इन्फ्रा. प्रा. लि.ने दोन्ही पत्रामध्ये आलेल्या वादासंबंधात निर्णय घेण्यासाठी प्रधानसचिव-२ यांचा आर्बिटेटर सहसचिव किंवा अन्य महानगरपालिकेचे आयुक्त असा उल्लेख केलेला आहे. आम्ही अन्य महानगरपालिकांच्या आयुक्तांमध्ये श्री. शिवमुर्ती नाईक साहेबांचे नाव घेतो.

**जयंत पाटील :-**

प्रधानसचिव श्री. खवारे यांचे नाव वाचले का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

आपला आता निर्णय झालेला आहे. आपण आता निश्चित शासनाला कळवू.

**सुर्यकांत भोईर :-**

भिवंडी महानगरपालिकेचे आयुक्त श्री. शिवमुर्ती नाईक यांचा उल्लेख करावा.

**जयंत पाटील :-**

जर महानगरपालिकेच्या विरोधात निर्णय गेला तर महानगरपालिका सुप्रीम कोर्टात जाण्याची तयारी करेल.

**प्रेमनाथ पाटील :-**

भिवंडी महानगरपालिकेची केस वेगळी आहे.

**जयंत पाटील :-**

मुळात तुम्ही जे करारपत्र केलेले आहे. त्या करारपत्रानुसार कोणार्क इन्फ्रा. प्रा. लि.वाला आपल्यासमोर येऊ शकत नाही. तो कुठलीही मागणी करु शकत नाही. कारण त्याच्याकडे करारपत्र आहे.

**रतन पाटील :-**

आपण करारपत्राने कोणार्क इन्फ्रा. प्रा. लि.ची मागणी फेटाळल्यामुळे तो पुढे गेलेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपण त्याचे करारपत्र फेटाळले आहे.

**मिलन पाटील :-**

ही समस्या श्री. शिवमुर्ती नाईक साहेबांकडे सोडवायला द्या.

**रतन पाटील :-**

साहेब, सर्वानुमते श्री. शिवमुर्ती नाईक साहेबांची नेमणूक करण्यात यावी असे नमुद करा.

**सुर्यकांत भोईर :-**

सर्वानुमते श्री. शिवमुर्ती नाईक साहेबांची नेमणूक करण्यात यावी असा ठरावामध्ये उल्लेख करा.

(सन्मा. सदस्य मोहन पाटील यांनी ठरावाचे वाचन केले.)

**प्रेमनाथ पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, माझे एक असे सजेशन आहे की जर श्री. शिवमुर्ती नाईक साहेबांनी मला ह्याच्यामध्ये इंटरेस्ट नाही असे सांगितले तर काय करायचे?

**मोहन पाटील :-**

परंतु, आपण हा विषय महासभेसमोर ठेवणार आहोत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

जर श्री. शिवमुर्ती साहेबांनी आपले मत डायरेक्ट सांगितले तर प्रधानसचिव तेच राहतील.

**मोहन पाटील :-**

आपण या ठिकाणी अशी दुरुस्ती करुया की ज्या ठिकाणी श्री. शिवमुर्ती साहेबांचे नाव सांगितलेले होते. त्या ठिकाणी त्यांची उपस्थिती आली नाही तर श्री. खवारे हे प्रधानसचिव आहेत. त्यांची नियुक्ती करावी आणि महासभेला शिफारस करण्यात यावी.

**मिलन पाटील :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

हा ठराव सर्वानुमते मंजुर करुन घ्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

श्री. शिवमुर्ती नाईक साहेबांची आयुक्त म्हणून नियुक्ती करायची आणि जर त्यांनी केले नाही तर प्रधानसचिव श्री. खवारे यांना या प्रकरणी निर्णयास्तव नेमायचे.

**मा. सभापती :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. १३ :-**

सन २००५-०६ सालातील जकात वसुली बाबत आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका आणि अभिकर्ता मे. कोनार्क इन्फ्रा. प्रा.लि. ह्यांच्यातील वादाबाबत (Dispute) केलेल्या कार्यवाही बाबत मा. स्थायी समितीच्या अवलोकनार्थ सादर करणे बाबत.

**ठराव क्र. १४ :-**

प्रस्तुत संदर्भात दोन्ही पक्षात झालेल्या वादा संदर्भात निर्णय घेण्याकरिता श्री. शिवमुर्ती नाईक, आयुक्त, भिवंडी निजामपूर महानगरपालिका ह्यांची नियुक्ती करणेंस मंजुरी देण्यांत येत आहे. श्री. शिवमुर्ती नाईक हे ह्या कामी उपलब्ध नाही झाले तर प्रधान सचिव ह्यांनी नियुक्ती करणेबाबत ही सभा मा. महासभेस शिफारस करीत आहे.

**सुचक :- श्री. मोहन पाटील.** **अनुमोदन :- श्री. मिलन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिव ह्यांनी प्रकरण क्र. १४ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य सुर्यकांत भोईर यांनी ठरावाचे वाचन केले.)

**प्रेमनाथ पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मिलन पाटील :-**

सदरहू कंपनीला ब्लॅक लिस्टमध्ये टाका.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सदरहू कंपनीला ब्लॅक लिस्टमध्ये टाका.

**गजानन भोईर :-**

आम्हाला हे मान्य आहे.

**प्रकरण क्र. १४ :-**

२५ मेट्रीक टन क्षमतेचा बायोगॅस व विद्युत निर्मिती प्रकल्प मंजूर निविदा रद्द करणे बाबत.

**ठराव क्र. १५ :-**

पेणकरपाडा स्मशान भुमि शेजारील जागेत २५ मेट्रीक टन क्षमतेचा बायोगॅस व विद्युत प्रकल्प उभारणी बांधा वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर प्रकल्प उभारणीची निविदा मे. मॅलहेम इंजिनियरिंग यांची मा. स्थायी समितीने ठराव क्र. १८७, दि. ०३/०३/२००५ रोजी मंजुर केली होती.

मॅलहेम इंजिनियरिंग यांचे बरोबर महापालिकेने दि. २० जुलै २००५ रोजी करारनामा केला. करारनाम्यातील अटीशर्ती नुसार कंपनीने महापालिके समवेत करारनामा केल्या तारखे पासून तीन महिन्यात उपरोक्त प्रकल्प उभारणी कामाची वित्तीय मंजुरी महापालिकेस सादर करायची होती. मुदतीत वित्तीय मंजुरी प्राप्त झाली नसल्याने या संबंधात मे. मॅलहेम इंजिनियरिंग यांना दि. १३/१०/२००५, जा.क्र. मनपा/आरोग्य/ ६४९/२००५-०६ अन्वये रजिस्टर पत्राद्वारे कळविण्यांत आले होते. आजपर्यंत मे. मॅलहेम इंजिनियरिंग यांचे कडुन खुलासा प्राप्त झालेला नाही.

कंपनीने दिलेल्या दुरध्वनीवर संपर्क साधला असता या दुरध्वनीवर कोणतेही उत्तर मिळत नाही. कंपनीच्या जेटर पॅडवर असलेल्या ई मेल ॲड्रेस वर ही पत्र पाठविले असता कोणतेही उत्तर आजपर्यंत प्राप्त झाले नाही. कंपनीने करारनामा केल्यानंतर महानगरपालिकेशी कोणत्याही प्रकारचा प्रकल्प उभारणी कामाबाबत संपर्क साधलेला नाही.

सर्व बाबींचा विचार करता पेणकरपाडा येथे उभारण्यात येणारा प्रकल्प रद्द करणेस मा. आयुक्त यांनी मंजूरी दिली आहे. सदरच्या प्रकल्पा करीता मे. मॅलहेम इंजिनियरिंग प्रा.लि. यांची मंजूर निविदा रद्द करणे व निविदे सोबत भरणा केलेली इसारा अनामत जप्त करण्यास मा. स्थायी समिती मंजूरी देत आहे. तसेच सदर कंपनीला ब्लॅक लिस्टमध्ये टाकण्यांत यावे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. सुर्यकांत भोईर.** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिव ह्यांनी प्रकरण क्र. १५ चे वाचन केले.)

**मिलन पाटील :-**

मी या ठिकाणी ठरावाचे वाचन करु इच्छितो.

**प्रभात पाटील :-**

माझे ठराव मांडण्याबाबत काहीही ऑब्जेक्शन नाही. परंतु, मी ठराव मांडण्यापूर्वी बोलू इच्छिते की याच्यामध्ये ज्या संस्थेची मुदत संपल्यानंतर त्यांनी पुढेदेखील ते कॅन्टीन चालवलेले आहे. त्याचे तुम्ही काय केले? त्या कॅन्टीनची मुदत कोणत्या तारखेला संपलेली आहे? स्थायी समितीच्या सन्मा. सदस्यांनी त्या उपहारगृहाला टाळे मारेपर्यंत ती कॅन्टीन चालली होती. ती कॅन्टीन संपलेल्या मुदतीपेक्षा किती वेळ जास्त चालली? आणि त्याच्या भाड्याचे काय झाले?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आम्ही त्याची माहिती घेतो. जर त्याचे भाडे एक्सेस झाले असेल तर तुमची मान्यता घेऊन कॅन्टीनला भाडे आकारणी केली जाईल. त्यांनी कॅन्टीनचा जेवढा जास्त वापर केलेला असेल तेवढी त्यांना भाडे आकारणी केली जाईल.

**रतन पाटील :-**

साहेब, तुम्ही कॅन्टीनच्या संदर्भात सेक्युरिटी ठेवणार आहात का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्यांची सेक्युरिटी नव्हती.

(सन्मा. सदस्य मिलन पाटील ह्यांनी ठरावाचे वाचन केले.)

**रतन पाटील :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. १५ :-**

महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील उपहारगृहाची जागा भाड्यावर देऊन उपहारगृह चालविणे कामी अभिकर्ता (एजंट) नेमणेच्या निविदाबाबत.

**ठराव क्र. १६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालय, भाईंदर (पश्चिम) येथील उपहारगृहाची जागा तीन वर्षाच्या (दि. ०१/०५/२००६ ते ३०/०४/२००९) कालावधीकरिता भाड्याने देऊन अभिकर्ता (एजंट) नेमणे कामी दि. ०६/०४/२००६ च्या दैनिक ''सागर'', ''मुंबई गुजरात'' वृत्तपत्रांत निविदा सूचना प्रसिद्ध करुन इच्छुकांकडून निविदा मागविण्यांत आल्या होत्या. सदर कामी प्राप्त झालेल्या सिलबंद पाकिटातील निविदा दि. २१/०४/२००६ रोजी सायंकाळी ठिक ०५.०० वाजता उपस्थित निविदाधारक व निविदा समिती सदस्य यांच्या समक्ष उघडण्यांत आल्या, त्या निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | महानगरपालिकेने ठरवलेल्या किमान देकाराची रक्कम | निविदाधारकाचे नांव व पत्ता | निविदेत नमुद केलेल्या देकारांची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | रु. १४,५३०/- (अक्षरी रु. चौदा हजार पाचशे तीस मात्र) | श्री. गोविंद धो. परब<br>अध्यक्ष,<br>मिरा भाईंदर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतपेढी मर्या. | रु. १५,२००/-<br>(अक्षरी रुपये पंधरा हजार दोनशे मात्र) |
| २ | '' | गुलाब शुक्ला,<br>उदय हेगडे<br>संभादेवी कॅटरर्स<br>बी-३०६, साई सरोवर बिल्डींग, एस. व्ही. रोड, भाईंदर (पूर्व) | रु. १७,८९१.५०/-<br>(अक्षरी रु. सतरा हजार आठशे एक्यान्नव व पन्नास पैसे मात्र) |
| ३ | '' | श्री. तुषार दामोदर गांवकर<br>श्री. सुरजप्रकाश शर्मा<br>किंग कॅटरर्स<br>सेक्टर नं. ४, ए-३/२४, शांतीनगर, मिरारोड (पूर्व) | रु. १५,११५.१०<br>(अक्षरी रु. पंधरा हजार एकशे पंधरा रु. व दहा पैसे मात्र) |

महानगरपालिकेच्या उपहारगृहाची जागा ३ वर्षाकरिता भाड्याने देऊन उपहारगृह चालविणेस देणे कामी महानगरपालिकेने मासिक भाड्यापोटी ठरविलेल्या किमान देकाराची रक्कम रु. १४,५३०/- (अक्षरी रु. चौदा हजार पाचशे तीस मात्र) इतकी आहे.

महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या निविदा पैकी **गुलाब शुक्ल, उदय हेगडे** यांची निविदा महानगरपालिकेने ठरवलेल्या किमान देकार रु. १४,५३०/- (अक्षरी चौदा हजार पाचशे तीस मात्र) पेक्षा जास्त रु. १७,८९१.५० (अक्षरी रु. सतरा हजार आठशे एक्यान्नव व पन्नास पैसे मात्र) आहे. तरी गुलाब शुक्ला, उदय हेगडे, संभादेवी कॅटरर्स, बी-३०६, साई सरोवर बिल्डींग, एस. व्ही. रोड, भाईंदर (पुर्व) यांची निविदा स्विकारणेस ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. मिलन पाटील.** **अनुमोदन :- श्री. रतन कृ. पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिव ह्यांनी प्रकरण क्र. १६ चे वाचन केले.)

**गजानन भोईर :-**

भाईंदरमध्ये चार शास्त्रीनगर आहेत. तुम्ही नेमके कुठल्या शास्त्रीनगरबाबत बोलत आहात?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आम्ही भाईंदर पश्चिम मधील शास्त्रीनगरबाबत बोलत आहोत.

**गजानन भोईर :-**

भाईंदर पश्चिमेला दोन शास्त्रीनगर आहेत.

**दिपक खांबित :-**

आम्ही प्रभाग क्र.३ मधील सन्मा. सदस्य नरेंद्र मेहता यांच्या वॉर्डमधील शास्त्रीनगरबाबत बोलत आहोत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

माझ्या प्रभागात एक धोकादायक दुकान आहे. परंतु, ते दुकान अद्यापपर्यंत तोडलेले नाही. ते दुकान तुटलेले आहे.

**मोहन पाटील :-**

ते दुकान बी.ई.टी.ओ. तत्वावर आहे का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ते दुकान बी.ई.टी.ओ. तत्वावर आहे.

**दिपक खांबित :-**

जर ते दुकान आपली प्रॉपर्टी असेल तर आम्ही कार्यवाही करु शकतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

धोकादायक प्रॉपर्टी ही बांधकाम विभागाच्या अखत्यारित असते. त्यामुळे तुम्ही त्या दुकानाचा सर्व्हे करुन योग्य तो निर्णय द्यावा.

(सन्मा. सदस्या ज्युडी डिसोझा यांनी ठरावाचे वाचन केले.)

**मिलन पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

माझी याच्यामध्ये अशी सुचना आहे की माझ्या प्रभागात धोकादायक दुकान आहे. तरी त्या दुकानावर योग्य ती कार्यवाही करावी.

**प्रकरण क्र. १६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भाईंदर (प.) प्रभाग क्र. ३ येथील शास्त्री नगर मधील धोकादायक सार्वजनिक शौचालये तोडून टाकणेस मान्यता देणे.

**ठराव क्र. १७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत भाईंदर (प.) प्रभाग क्र. ३ येथे महानगरपालिकेची शौचालये आहे. सदर शौचालये अत्यंत धोकादायक अवस्थेत असुन कधीही कोसळण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर शौचालये तोडुन त्वरीत नविन शौचालये बांधावयाची असल्याने जुनी शौचालय तोडण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

**सुचक :- श्रीम. ज्युडी डिसोझा.** **अनुमोदन :- श्री. मिलन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिव ह्यांनी प्रकरण क्र. १७ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य सुर्यकांत भोईर यांनी ठरावाचे वाचन केले.)

**प्रेमनाथ पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मिलन पाटील :-**

कुत्रे पकडताना त्या-त्या प्रभागातील नगरसेवकांना त्याची माहिती दिली पाहिजे.

**ज्युडी डिसोझा :-**

मी असा ठराव पूर्वीच मांडलेला होता. परंतु, ती लोक आपल्याला कधीच विचारायला आलेले नव्हते.

**मा. सभापती :-**

हा विषय मंजुर आहे.

**प्रकरण क्र. १७ :-**

पशुसंवर्धन विभागातील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त कामी आलेल्या निविदेला मंजुरी मिळणे बाबत.

**ठराव क्र. १८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करणे कमी दि. २५/०३/२००६ रोजी दै. जन्मभूमी व सुरजप्रकाश या वृत्तपत्रात जाहीर निविदा सुचना प्रसिद्ध करणेल आल्या होत्या. सदर सुचनेनुसार एकुण चार निविदा मुदतीत प्राप्त झाल्या असून सदरच्या निविदा दि. ०४/०४/२००६ रोजी उघडण्यांत आल्या असून त्यांचे एकत्रीत कामाच्या दराचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे

| अ. क्र. | तपशील | एकत्रित दर | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | मे. लोकमान्य टिळक ग्रामीण सर्व सेवा संस्था, पुणे | मे. दि. ॲनिमल वेल्फअर सोसायटी, ठाणे | मे. दि. ॲनिमल वेल्फअर सोसायटी, अंबरनाथ | मे. व्ही. टीम एकोनेड, ठाणे |
| १. | संस्थेच्या डॉग व्हॅनमधून संस्थेच्या प्रशिक्षित कर्मचाऱ्यामार्फत साफ्ट लुपचा उपयोग करुन महानगरपालिका क्षेत्रातील कुत्रे पकडणे. | १,१९०/- प्रती श्वान | १,०८०/- प्रती श्वान | ९९०/- प्रती श्वान | १,०५०/- प्रती श्वान |
| २. | पकडलेली कुत्री शिरे - गावठन उत्तन येथील प्रकल्पावर नेणे. | | | | |
| ३. | कुत्र्यांवर निर्बिजीकरणाची शस्त्रक्रिया संस्थेच्या अनुभवी शल्यविशारदामार्फत करणे. | | | | |
| ४. | शल्य चिकित्सेनंतर कुत्रे बरे होईपर्यंत औषधोपचार व खानपानाची व्यवस्था करणे. | | | | |
| ५. | शस्त्रक्रिया केलेल्या श्वानांना ओळख चिन्ह देणे व श्वानदंश प्रतिबंधक लस देणे. | | | | |
| ६. | बरे झलोले कुत्रे मुळ जागी परत सोडणे. | | | | |
| ७. | आलेल्या तक्रारीनुसार जखमी कुत्र्यावर उपचार करणे. | | | | |
| ८. | पिसाळलेल्या कुत्र्याचा बंदोबस्त करणे. | | | | |

वरीलप्रमाणे दर असून मे. ॲनिमल वेल्फेअर सोसायटी, अंबरनाथ यांचे दर प्रती श्वान रु. ९९०/- असून त्यांना वाटाघाटीस बोलाविले असता त्यांनी मागील वर्षाच्या रु. ९५०/- दर प्रमाणे प्रती श्वान एकत्रीत काम करण्याचे मान्य केले असून मे. ॲनिमल वेल्फेअर सोसायटी, यांचे दर वाजवी असून वाटाघाटीनंतर मान्य केलेल्या सर्वात कमी दराची निविदा स्विकारण्यास व या कामी वेळोवेळी येणारे देयक अदा करणेस मा. स्थायी समिती मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. सुर्यकांत अ. भोईर.** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिव ह्यांनी प्रकरण क्र. १८ चे वाचन केले.)

**नगरसचिव :-**
हा विषय अगोदरच मंजुर झालेला आहे.

**केशव घरत :-**
तुम्ही टायमिंग ठरवा. कुठे जायचे तेसुध्दा ठरवा.

**नगरसचिव :-**
आपण टायमिंग वगैरे मिटींगनंतर ठरवूया.

**ज्युडी डिसोझा :-**
या विषयावर चर्चा कधी झाली?

**नगरसचिव :-**
या विषयावर चर्चा झालेली आहे.

**प्रभात पाटील :-**
कोणता विषय चालू आहे? तेच समजत नाही.

**ज्युडी डिसोझा :-**
तुम्ही आम्हाला सविस्तर सांगा.

**केशव घरत :-**

दौऱ्याला कधी जायचे आहे ते सांगा?

**मोहन पाटील :-**

आपण प्रकरण क्र. १८ वर मघाशी चर्चा केलेली होती. आपल्याला स्थायी समितीचा दौरा अंदमान व निकोबार किंवा अन्य कुठेतरी घ्यायचे ठरलेले होते.

**जयंत पाटील :-**

आपण दौऱ्याला जाण्याबाबत फक्त विचारविनिमय करित आहोत.

**मोहन पाटील :-**

आपण तीस सदस्यांचा दौरा आयोजित करताना त्याच्याबरोबर मिरा भाईंदर महानगरपालिकेचे नगरसेवक वगैरे सगळे मिळून आपल्याला एक कम्बाईन प्रशिक्षण दौरा आयोजित करायचा आहे.

**ज्युडी डिसोझा :-**

तुम्ही ठराव करा असे मी सांगितले तर ती लोक बोलतात की स्थायी समितीचा वेगळा ठराव करायचा असतो.

**प्रभात पाटील :-**

तुमचे सचिव ठराव बदली करण्याबाबत विचारणा करण्यासाठी गेलेले होते. परंतु, ठराव बदली करायला दिलेला नाही. त्यामुळे हा महिला व बालकल्याण समितीचा ठराव झालेला आहे.

**ज्युडी डिसोझा :-**

श्री. संख्येंना मी सांगितलेले होते की ठराव बदली करा. परंतु, महिलांचा वेगळा ठराव आलेला आहे. असे ते बोलले.  तुम्ही त्यांना विचारा.

**प्रभात पाटील :-**

तुम्ही नीट काहीतरी बोला असे माझे म्हणणे आहे.

**मा. सभापती :-**

अगोदर हा विषय घ्या आणि या ठरावाचा विषय नंतर घ्या.

**ज्युडी डिसोझा :-**

तुम्हाला ठरावात बदल करावा लागेल.

**प्रभात पाटील :-**

आता दिलेल्या ठरावामध्ये बदल करावा लागेल.

**रतन पाटील :-**

कुठल्या ठरावात बदल करावा लागेल?

**ज्युडी डिसोझा :-**

स्पेशली महिला व बालकल्याण समितीचा ठराव पास केलेला आहे.

**रतन पाटील :-**

फक्त महिला व बालकल्याण समितीचा ठराव पास केलेला नाही. त्याच्यामध्ये सर्व नगरसेवकांचासुध्दा समावेश केलेला आहे.

**मोहन पाटील :-**

हा शैक्षणिक दौरा नसून हा आभ्यास दौरा आहे.

**गजानन भोईर :-**

हा स्थायी समितीचा दौरा आहे ना.

**मोहन पाटील :-**

होय.

**गजानन भोईर :-**

परंतु, ह्याच्यामध्ये स्थायी समितीचा उल्लेख केलेला नाही.

**ज्युडी डिसोझा :-**

तुम्ही ठरावामध्ये स्थायी समितीचा उल्लेख करा.

**गजानन भोईर :-**

तुम्ही ठरावामध्ये स्थायी समितीचा उल्लेख करा.

**मोहन पाटील :-**

सचिव साहेब, तुम्ही विषयाचे पुन्हा एकदा वाचन करा.

**नगरसचिव :-**

मी पुन्हा एकदा विषयाचे वाचन करतो. स्थायी समितीच्या अभ्यास दौऱ्याबाबत विचारविनिमय करणे.

**प्रभात पाटील :-**

माझी तुम्हाला एक विनंती केली आहे की सध्या बहुतेक सदस्यांच्या मुलांना शाळेच्या सुट्ट्या आहेत. माझ्यासारख्या नोकरी करणाऱ्यांनासुध्दा सुट्ट्या आहेत. त्यामुळे तुम्ही हा दौरा लवकरात लवकर आयोजित करा.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्ही दौरा आयोजित करण्यासाठी ह्या महिन्याचा विचार करावा.

**केशव घरत :-**

तुम्ही शेवटच्या आठवड्यात किंवा पाहिल्या आठवड्यात दौरा आयोजित करा.

**मा. सभापती :-**

सदरचा विषय मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १८ :-**

शैक्षणिक सहली बाबत विचार विनिमय करणे.

**ठराव क्र. १९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका स्थायी समिती सदस्य, अधिकारी / पदाधिकारी ह्यांच्या शैक्षणिक सहलीस ही सभा आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत आहे. सदर सहल आयोजित करण्याचे सर्व अधिकारी सभापती स्थायी समिती ह्यांना देण्यांत येत आहेत.

**सुचक :-** **अनुमोदन :-**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिव ह्यांनी प्रकरण क्र. १९ चे वाचन केले.)

**प्रेमनाथ पाटील :-**

या विषयाचा गोषवारा दिलेला नाही.

**मोहन पाटील :-**

या विषयाला गोषवारा दिला जात नाही.

(सन्मा. सदस्य मिलन पाटील ह्यांनी ठरावाचे वाचन केले.)

**केशव घरत :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**रतन पाटील :-**

आपण आपल्याकडे असलेल्या गाड्यांचे काय करायचे?

**मिलन पाटील :-**

आपण त्या गाड्या विकायच्या.

**मा. सभापती :-**

सदर विषय मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १९ :-**

वाहन खरेदी बाबत विचार विनिमय करणे.

**ठराव क्र. २० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत सन २००५-०६ या वर्षात अर्थसंकल्पात तरतूद केल्यानुसार खालीलप्रमाणे वाहने खरेदी करण्यात यावीत.

| | | |
|---|---|---|
| १) | महापौर | १ मारुती बलेनो |
| २) | सभापती, स्थायी समिती | १ मारुती बलेनो |
| ३) | अध्यक्ष शिक्षण मंडळ | २ एम्बासेंडर (पेट्रोल) |
| ४) | कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा) | १ मारुती एस्टीम |
| ५) | कार्यकारी अभियंता (बांधकाम) | १ मारुती एस्टीम |

वरीलप्रमाणे वाहने खरेदी करण्यास व खर्चास मान्यता देण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. मिलन पाटील.** **अनुमोदन :- श्री. मोहन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिव ह्यांनी प्रकरण क्र. २० चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील ह्यांनी ठरावाचे वाचन केले.)

**सुर्यकांत भोईर :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. २० :-**

निविदांना मंजुरी देणेबाबत. (आरोग्य विभाग)

**ठराव क्र. २१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील कच्चे पक्के नाले, गटारे सफाई / खोदाई करणे, गाळ उपसणे आदी कामे पावसाळ्यापुर्वी पुर्ण होण्याच्या दृष्टीने शहराची ५ गटात विभागणी करुन प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्याचे अवलोकन केले असता शहरातील कच्चे पक्के नाले, गटारे सफाई करणेसाठी जे.सी.बी. मशिन, पोकलन ६०, पोकलन इ.एक्स. ४० मशिन बोटीसह आदी भाड्याने पुरवठा करणे कामी खालीलप्रमाणे निविदाकाराने दर सादर केले आहेत.

| गट क्र. | निविदाकाराचे नाव | जे.सी.बी. मशिनचे दर | पोकलन ६० मशिनचे दर | पोकलन ४० बोटीसह मशिनचे दर |
|---|---|---|---|---|
| ३ व ४ | मे. गणेश अर्थ मुव्हींग कं. | रु. ७७५/- | रु. १४३०/- | रु. १४३०/- |
| १, २ व ५ | मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन | रु. ७७५/- | रु. १४३०/- | रु. १४३०/- |

तरी वरीलप्रमाणे गट क्र. ३ व ४ करीता मे. गणेश अर्थ मुव्हींग कंपनी व गट क्र. १, २ व ५ करीता मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन यांनी सादर केलेले दरास ही सभा मान्यता देत असून या कामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.** **अनुमोदन :- श्री. सुर्यकांत भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिव ह्यांनी प्रकरण क्र. २१ चे वाचन केले.)

**प्रभात पाटील :-**

हा अवलोकनाचा विषय आहे हे बरोबर आहे. तुम्ही टिप्पणीच्या शेवटी दिलेले आहे की वाहनांची संख्या लक्षात घेता जुन्या ठेकेदाराला नव्याने निविदा मंजुर करुन मुदतवाढ द्यायची आहे. म्हणजे त्या ठेकेदाराला अवलोकन करुन मुदतवाढ करण्याचा ठरावसुध्दा करायचा असे एकत्रित होऊ शकत नाही. प्रकरण क्र. २१ मध्ये शिफारस केलेल्या निविदेचे अवलोकन करणे असे म्हटलेले आहे. महापालिकेतील वाहनावर ठेका पध्दतीने वाहनचालकांचा पुरवठा करणे असा विषय लिहलेला आहे. शेवटच्या दोन ओळीमध्ये अवलोकनार्थ सादर असे लिहिलेले आहे. परंतु, ठेका पध्दतीने वाहनचालकांचा पुरवठा करण्यासाठी लागणाऱ्या निविदेच्या कालावधीच्या प्रक्रियेचा विचार करता, असलेल्या वाहनांची संख्या लक्षात घेता अत्यावश्यक बाब म्हणून जुन्या ठेकेदाराने नव्याने निविदा कार्यान्वित करण्यासाठी मुदतवाढ द्यायची. एका ठिकाणी अवलोकन आहे आणि दुसऱ्या ठिकाणी मुदतवाढ आहे. ही दोन्ही कामे एकत्रित होऊ शकत नाहीत.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण वर्क ऑर्डर देण्याच्या कालावधीपर्यंत निविदा कार्यान्वित करण्यासाठी देण्यात येत आहे असे आहे. हा निर्णय नाही. असा आयुक्त साहेबांचा आदेश आहे. या ठेकेदाराला आदेश द्यायला पाच-दहा दिवस लागतील. आपण कॅन्टीनचे बोलल्याप्रमाणे त्या ठेकेदाराने कॅन्टीनेचे जास्तीचे काम केलेले आहे. आपण दरम्यानच्या काळामध्ये त्याचे पेमेन्ट दिलेले आहे.

**प्रभात पाटील :-**

या माणसाचा कुठेही काहीही उल्लेख नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्या माणसाच्या निविदेचे दर कमी होते.

**प्रभात पाटील :-**

आम्हाला निविदेचे कुठलेही दर दाखविलेले नाहीत.

**मिलन पाटील :-**

आम्हाला निविदेचे दर दाखविले असते तर ते दर कमी आहेत की जास्त आहेत ते समजले असते. परंतु, आम्हाला निविदेचे दर दाखविलेले नाहीत.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब, आपण वाहन ठेक्यावर अधिका-यांसाठी घेतलेल्या लोकांचे पेमेन्ट करित नाही ना?

**मिलन पाटील :-**

तुमच्याकडे दराच्या विषयाची संपूर्ण माहिती उपलब्ध नसल्यामुळे तुम्ही हा विषय पुढच्या वेळेला घ्या.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आमच्याकडे या विषयाची फाईल असल्यामुळे माहितीसुध्दा उपलब्ध आहे.

**गजानन भोईर :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील, तिघांनी कॅन्टीनचे टेन्डर भरलेले होते. तेव्हा संपूर्ण माहिती आणली होती. आता माहिती का आणत नाही? आतासुध्दा सविस्तर माहिती येऊ दे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण ज्यावेळेला संपूर्ण माहितीसाठी निर्णय देतो. तोच मंजुर केलेला निर्णय दिलेला आहे. मा. आयुक्त साहेबांना सादर केलेले दरपत्रक तुम्ही बघू शकता. आमच्याकडे ते दरपत्रक उपलब्ध आहे.

**मोहन पाटील :-**

तुम्ही हा विषय पुढच्या मिटींगमध्ये घ्या.

**गजानन भोईर :-**

तुम्ही या विषयाची माहिती द्या. किती पैसे भरलेले होते वगैरे समजेल.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब, आपण मागच्या वेळेला अधिका-यांना ठेका पध्दतीने सालासर ट्रान्सपोर्ट वगैरेसारख्या गाड्या दिलेल्या होत्या. त्याचे पेमेन्ट दिलेले आहे का?

**गजानन भोईर :-**

अधिका-यांच्या गाड्यांचे पेमेन्ट दिलेले नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

त्या पेमेन्ट धारकांची सात-सात महिने पेमेन्ट न दिल्याबाबतची तक्रार आहे.

**गजानन भोईर :-**

त्यांचे संपूर्ण पेमेन्ट बाकी आहे ही खरी गोष्ट आहे.

**ज्युडी डिसोझा :-**

अजुनपर्यंत बहुतेक गाड्यांचे पेमेन्ट दिलेले नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

महानगरपालिकेकडून सात महिने पेमेन्ट मिळालेले नाही असे ठेकेदार स्वतः सांगतो.

**मोहन पाटील :-**

आपण हा विषय पुढच्या मिटींगला घेऊया. आपण दोन्ही विषय पुढच्या मिटींगला घेऊन तेव्हाच चर्चा करुया.

**मा. सभापती :-**

हा विषय पुढच्या मिटींगला घेण्यात यावा.

**प्रकरण क्र. २१ :-**

वाहन चालक पुरवठा करणेकामी आलेल्या निविदांना मंजुरी देणेबाबत.

**ठराव क्र. २२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वाहनावर सन २००६-०७ या वर्षाकरीता ठेका पद्धतीने वाहनचालक पुरवठा करणेकामी दै. वृत्तमानस व दै. मुंबई संध्या या वृत्तपत्रात दि. २२/०३/२००६ रोजी प्रसिद्ध केलेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार खालील ठेकेदारांनी आपल्या निविदा मुदतीत सादर केलेल्या आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | विणा ट्रॅव्हल्स यांचे निविदेतील दर | | विणा ट्रॅव्हल्स यांचे वाटाघाटीनंतरचे दर | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रति दिन | प्रति महिना | प्रति दिन | प्रति महिना |
| १ | डंपर (ट्रक) | २६५ | ६२९९ | १५४ | ४६०४ |
| २ | जेसीबी | ४१५ | ९१२५ | २३१ | ७१६१ |
| ३ | पोकलन | ४७५ | ९४७५ | २३१ | ७१६१ |
| ४ | मोठा टेम्पो | २३५ | ५९९९ | १५४ | ४६०४ |
| ५ | सक्शन टेम्पो | २३५ | ५९९९ | १६० | ४८०० |

| अ.क्र. | तपशिल | विणा ट्रॅव्हल्स यांचे निविदेतील दर | | विणा ट्रॅव्हल्स यांचे वाटाघाटीनंतरचे दर | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रति दिन | प्रति महिना | प्रति दिन | प्रति महिना |
| ६ | जेटींग पंप | २३५ | ५९९९ | १६० | ४८०० |
| ७ | रुग्णवाहीका | २३५ | ५९९९ | १५४ | ४६०४ |
| ८ | फिरता दवाखाना | २५१ | ६२९९ | १५४ | ४६०४ |
| ९ | शववाहीनी | २३५ | ५९९९ | १६५ | ४९०० |
| १० | मोबाईल जीप | २२५ | ५८९९ | १५४ | ४६०४ |
| ११ | अग्निशमन बंब | ३७५ | ७२९९ | १८२ | ५३५६ |
| १२ | जीप | २३५ | ५७९९ | १५४ | ४६०४ |
| १३ | टॅंकर | २६५ | ६३९९ | १५४ | ४६०४ |
| १४ | जीप | २३५ | ५७९९ | १५४ | ४६०४ |
| १५ | कार | २३५ | ५७९९ | १५४ | ४६०४ |
| १६ | हायड्रोलीक शिडी | २६५ | ६२९९ | १६५ | ४९०० |
| १७ | ट्रॅक्टर | २३५ | ५९९९ | १६० | ४८०० |
| १८ | मोबाईल व्हॅन | २२५ | ५८९९ | १५४ | ४६०४ |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मे. विणा ट्रॅव्हल्स यांचे अ.क्र. १, २, ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १०, ११, १३, १६, १७, १८ चे दर सर्वात कमी दराचे आहेत व अ.क्र. १२, १४, १५ हे मे. बालाजी ट्रॅव्हल्स यांचे दर सर्वात कमी आहेत. मे. बालाजी ट्रॅव्हल्स दि. २९/०४/२००६ रोजी पत्र देऊन सदर मंजूर दरानुसार काम करण्यास असमर्थता दर्शविलेली आहे. परंतू, मे. विणा ट्रॅव्हल्स यांनी दि. २९/०४/२००६ रोजी पत्र देऊन सदर बालाजी ट्रॅव्हल्स यांच्या दरापेक्षा कमी दराने ठेक्याने वाहनचालक पुरवठा करण्याची तयारी दर्शविलेली आहे. वरील वस्तुस्थितीचा विचार करता मुंबई प्रांतिक महानगरपालिकाचे अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा. आयुक्त यांनी मंजूर केलेले असून स्थायी समितीस अवलोकनार्थ सादर.... परंतु, ठेका पद्धतीने वाहनचालक पुरवठा करण्यांस लागणारे निविदेच्या कालवधीच्या प्रक्रियेचा विचार करता व असलेल्या वाहनांची संख्या लक्षात घेता अत्यावश्यक बाब गरज म्हणून जुन्या ठेकेदाराला नव्याने संविदा मंजूर होऊन कार्यादेश देण्याच्या प्रक्रियेपर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. सदरचा प्रस्ताव अवलोकनार्थ सादर.

**सुचक :- श्री. मिलन पाटील.** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिव ह्यांनी प्रकरण क्र. २२ चे वाचन केले.)

**प्रभात पाटील :-**

तुम्हाला नवघरचीच शाळा दिसते का?

**गजानन भोईर :-**

हा विषय कोणी आणलेला आहे?

**प्रभात पाटील :-**

तुम्ही ती नवघरची शाळा बंद करुन विकून टाका. कारण त्या शाळेमध्ये गाळे बांधा, शाळा भाड्याने द्या, मैदान भाड्याने द्या असे चाललेले असते.

**गजानन भोईर :-**

हा विषय कोणी आणि कशासाठी आणलेला आहे? ते प्रथम सांगा.

**प्रेमनाथ पाटील :-**

या विषयाचा गोषवारा कुठे आहे?

**प्रभात पाटील :-**

या विषयाबाबत कोणी पत्र दिलेले होते? ते प्रथम सांगा.

**प्रेमनाथ पाटील :-**

हा विषय कमिशनर साहेबांनी आणलेला आहे की दुसऱ्या कोणी आणलेला आहे? ते सांगा.

**रतन पाटील :-**

आपण गटारावर गाळे बांधणार आहोत का?

**गजानन भोईर :-**

तुम्ही नवघरची शाळाच विका. तुम्हाल फक्त एक नवघरचीच शाळा दिली का?

**प्रभात पाटील :-**

यांना फक्त नवघरचीच शाळा दिसते.

**प्रेमनाथ पाटील :-**

नवघरची शाळा ओपन आहे. म्हणून त्याच शाळेचा विचार केला जातो.

**जयंत पाटील :-**

मा. अध्यक्ष महोदय, या विषयाबाबत कोणी पत्रव्यवहार केलेला आहे? आणि हा विषय कोणी आणलेला आहे? ते सांगा.

**गजानन भोईर :-**

हा विषय कोणी आणलेला आहे?

**प्रभात पाटील :-**

हा विषय कोणी आणलेला आहे? ते सांगा.

**मोहन पाटील :-**

हा विषय कोणीतरी ढकललेला आहे.

**रतन पाटील :-**

साहेब हा चांगला विषय आहे. या विषयावर चर्चा होणे गरजेचे आहे.

**जयंत पाटील :-**

हा विषय कोणी आणलेला आहे? ते आम्हाला समजले पाहिजे.

**रतन पाटील :-**

तुम्ही या विषयामध्ये दुसऱ्या सुचनासुध्दा घ्या.

**मा. सभापती :-**

मागच्या वेळेला हा विषय चर्चेला घेण्याचे ठरलेले होते.

**जयंत पाटील :-**

आपले असे काहीही ठरलेले नव्हते.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपले काहीही ठरलेले नव्हते.

**रतन पाटील :-**

महापालिकेला उत्पन्न प्राप्त झाले पाहिजे अशी सुचना नमुद करुन घ्या.

**गजानन भोईर :-**

तिथे गाळे बांधून शाळा विकायचे ठरलेले नव्हते.

**जयंत पाटील :-**

तुम्ही एक गोष्ट लक्षात घ्या की ते शाळेचे आरक्षित मैदान आहे. तुम्हाला त्या मैदानामध्ये फेरफार करता येणार नाही. दुसरी गोष्ट म्हणजे तुम्ही शहरात रस्ता रुंदीकरणासाठी इमारती तोडून रस्ता रुंदीकरण केलेले आहे. तुम्ही तिथे स्टॉल टाकून रस्ता अरुंद करणार. तिथे शेजारी एस.एन. कॉलेज आहे. त्या कॉलेजमध्ये चार हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. जर त्या रस्त्यावर टपऱ्या झाल्या तर तुम्हाला कुठल्याही तऱ्हेची सुधारणा करता येणार नाही. तुम्ही बोलता की त्या रस्त्यावर मार्केट बसते. ते मार्केट फक्त संध्याकाळीच बसते आणि ती लोकांची गरज आहे. तुम्ही मोर्केट दुसरीकडे बांधा. परंतु, त्या रस्त्यावर एकही टपरी होता कामी नये.

**मिलन पाटील :-**

दुसरी गोष्ट म्हणजे जर तुम्ही या टपऱ्या काढल्या तर त्या ठिकाणी गोवा आणि गुटखे विकले जातील आणि मुले ती विकत घेऊन खायला लागतील.

**मोहन पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब, तुम्ही या ठिकाणी हा विषय आणलेला आहे. परंतु, सध्या त्या ठिकाणी ॲग्रीमेन्ट झालेले होते. तुम्ही त्याचे काय करणार?

**जयंत पाटील :-**

आमचा टपऱ्या उभारण्याला विरोध आहे.

**ज्युडी डिसोझा :-**

हा विषय कोणी आणलेला आहे.

**रतन पाटील :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील, तुम्ही बरोबर बोलतात. आता भाईंदर पूर्व विभागाचे फायर स्टेशन पास झालेले आहे. ते फायर स्टेशन पूर्वेच्या झुणका भाकर केंद्राकडे घेतले तर बरे होईल.

**गजानन भोईर :-**

बाहेरील टाकीजवळ जागा फायर स्टेशनसाठी योग्य आहे.

**रतन पाटील :-**

परंतु, तिथे रस्ता नाही.

**मोहन पाटील :-**

आपण तिथे रस्ता करुया.

**रतन पाटील :-**

आपण रस्ता कुठून काढणार?

**गजानन भोईर :-**

आता टाकीजवळ एका बाजुला रस्ता बाहेरुनसुध्दा जातो. त्यामुळे फायर स्टेशन टाकीजवळ होऊ दे.

**प्रभात पाटील :-**

साहेब, हा विषय प्रभाग समितीमध्ये घ्या.

**रतन पाटील :-**

तिथे फायर स्टेशन नाही. त्यामुळे फायर स्टेशन झुणका भाकर केंद्राजवळ होऊ दे.

**गजानन भोईर :-**

आम्ही झुणका भाकर केंद्राजवळ फायर स्टेशन व्हायला देणार नाही.

**रतन पाटील :-**

झुणका भाकर केंद्र शासनाने दिलेले असल्यामुळे तिथे फायर स्टेशन व्हायला हरकत नाही.

**गजानन भोईर :-**

शासनाने झुणका भाकर केंद्र दिलेले असले तरी तिथे फायर स्टेशन द्यायचे नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

शिवसेनेने शासनाला दिलेले आहे.

**रतन पाटील :-**

तुम्ही आमच्यावर आरोप लावू नका. तुम्ही आता कोणाचे शासन आहे? आणि काय चाललेले आहे? ते बघा.

**मिलन पाटील :-**

तुम्ही आम्हाल बयाना देता का?

**प्रभात पाटील :-**

आमचे शासन असे काहीतरी कोणाला देत नाही.

**रतन पाटील :-**

आपण महाराष्ट्र शासनाच्या जागेवर फायर स्टेशन दिलेच पाहिजे.

**प्रभात पाटील :-**

हा विषय प्रभाग समितीमध्ये आलेला आहे. त्याचे एस्टिमेट टाकलेले आहे.

**गजानन भोईर :-**

झोपडपट्टीच्या बाजुला टाकीजवळ फायर स्टेशन द्यायचे ठरले होते.

**प्रभात पाटील :-**

प्रभाग समितीमध्ये झोपडपट्टीच्या टाकीजवळ फायर स्टेशन द्यायचे ठरलेले आहे.

**रतन पाटील :-**

हा विषय प्रभाग समितीमध्ये झालेला असला तरी या विषयावर सविस्तर चर्चा करण्यासाठी हा विषय घेतला तर काय बिघडते?

**गजानन भोईर :-**

आम्ही हा विषय पुढे घ्यायला देणार नाही.

**प्रभात पाटील :-**

आम्ही हा विषय घ्यायला देणार नाही.

**रतन पाटील :-**

त्या मैदानात टपऱ्या लागलेल्या आहेत. त्याचे काय करायचे? ते सांगा

**प्रभात पाटील :-**

त्या टपऱ्या कढायच्या होत्या.

**रतन पाटील :-**

झुणका भाकर केंद्राच्या सगळ्या बाजुने टपऱ्या वाढत चाललेल्या आहेत.

**मिलन पाटील :-**

तुम्ही टपरीवाल्यांचा बयाना घेतलेला आहे का?

**रतन पाटील :-**

तुमचं डोकं ठिकाणावर आहे का? झुणका भाकर केंद्राजवळील टपऱ्या काढाव्यात असे माझे म्हणणे आहे.

**गजानन भोईर :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील, टपऱ्या काढा सांगतात. त्यांचे हे म्हणणे योग्य आहे.

**जयंत पाटील :-**

हा विषय फेटाळलेला आहे.

**गजानन भोईर :-**

हा विषय फेटाळलेला आहे.

**मा. सभापती :-**

नवघर शाळेचा विषय फेटाळण्यात येत आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

नवघर शाळेचा विषय फेटाळणे योग्य आहे.

**प्रभात पाटील :-**

यापुढे नवघर शाळेच्या संदर्भात असा कुठलाही विषय येता कामा नये.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हा विषय फेटाळा. परंतु, या विषयाला काहीतरी सजेशन द्या.

**रतन पाटील :-**

या विषयावर काही सजेशन असेल तर सांगा.

**जयंत पाटील :-**

हा विषय सर्वानुमते फेटाळलेला आहे.

**मा. सभापती :-**

नवघर शाळेचा विषय सर्वानुमते फेटाळण्यात येत आहे.

**प्रभात पाटील :-**

तुम्ही नवघर शाळेच्या मैदानावर टपऱ्या होतात असे बोलता. परंतु, सगळ्या टपऱ्या उडवलेल्या आहेत.

**मा. सभापती :-**

नवघर शाळेच्या मैदानाच्या गेटवर भरपुर टपऱ्या असतात. त्यामुळे आतमध्ये जायला जागा नसते.

**जयंत पाटील :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही त्या टपऱ्यावाल्यांना सपोर्ट न करता सगळ्या टपऱ्या काढून टाका.

**प्रभात पाटील :-**

तुम्ही त्या सगळ्या टपऱ्या काढून टाका.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब, नवघर शाळेच्या गेटजवळील सर्व टपऱ्या डिमॉलीश करुन तेथील रस्ता मोकळा करुन घ्या.

**जयंत पाटील :-**

आमचा या टपऱ्या लावायला विरोध आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आज आलेल्या कामांचा पुढच्या मिटींगमध्ये रिपोर्ट द्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

नवघर शाळेच्या गेटसमोरील सगळ्या टपऱ्या उडवून टाका.

**गजानन भोईर :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही प्रकरण क्र.२१ हा अवलोकनाचा विषय का फेटाळला? कारण अवलोकनाचा विषय कधीही फेटाळता येत नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

अवलोकनाचा विषय फेटाळता येत नाही.

**प्रभात पाटील :-**

अवलोकनाचा विषय फेटाळता येत नाही. त्याचा निर्णय असतो.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी प्रकरण क्र. २१ बाबत असे सांगु इच्छितो की, आपण वाहनचालकांबाबत वर्षाला जो ठेका देतो तो मा. आयुक्त साहेबांच्या अधिकारातील आहे.

**प्रभात पाटील :-**

परंतु, त्याचा निर्णय असतो.

**गजानन भोईर :-**

प्रथम तुम्ही अवलोकन फेटाळता येते का ते सांगा. अवलोकन फेटाळता येत असेल तर आम्ही हा विषय फेटाळू.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्याला अवलोकनाचा विषय फेटाळता येत नाही.

**मा. सभापती :-**

मा. उपायुक्त श्री. खातगावकर साहेब याठिकाणी उपस्थित आहेत. मी मा. उपायुक्त साहेबांना सांगू इच्छितो की आपल्या सभा होतात, त्या सभांमध्ये वेगवेगळे विषय येतात. आपल्या सभांमध्ये जेवढे विषय येतील आणि त्या विषयाशी संबंधित जेवढे अधिकारी असतील त्या अधिका-यांची या ठिकाणी ताबडतोब मिटींग घेऊन सगळे विषय अंमलात आणावे असे माझे मत आहे.

**केशव घरत :-**

परंतु, असे कधीच होत नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, स्थायी समितीची सभा संपल्यानंतर अधिका-यांची मिटींग लगेच ठेवा.

**मोहन पाटील :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो की, आपले आजपर्यंत जेवढे ठराव झालेले आहेत, ते सगळे ठराव एकत्र करुन बजेटचा आढावा घ्या.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

प्रकरण क्र. २२ फेटाळलेला आहे ना.

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. २२ फेटाळलेला आहे.

**ज्युडी डिसोझा :-**

मा. सभापती महोदय, आमच्या वॉर्डामध्ये तीन-तीन दिवसानंतर पाणी येते. त्यामुळे तुम्ही पाण्याविषयी संबंधित अधिका-यांकडे चौकशी करा.

**कैलासबेन जानी :-**

तुम्ही गेल्या वेळेला पाण्यासंबंधी मिटींग बोलावणार होते. त्याचे काय झाले?

**जयंत पाटील :-**

पाणी फार कमी येते. काही प्रभागांमध्ये पाणी मिळत नाही.

**ज्युडी डिसोझा :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही श्री. बारकुंड साहेबांना पाण्याविषयी विचारा.

**कैलासबेन जानी :-**

साहेब, तुम्ही पाण्याचे पाईप चेक करा.

**शिवाजी बारकुंड :-**

आपल्याकडे मागच्या वेळेला पाण्याचा प्रॉब्लम निर्माण झालेला होता. त्यामुळे पाणी कमी येत असण्याची शक्यता आहे.

**मा. सभापती :-**

आमच्या नवघर गावात पाणी आलेले होते. आज पाणी आलेच नाही.

**मिलन पाटील :-**

आमच्याकडे दोन दिवस पाणी आलेले नव्हते.

**कैलासबेन जानी :-**

आमच्याकडे पाणी येतच नाही. तुम्हाला पाण्यासाठी पुन्हा मिटींग बोलवावी लागेल.

**शिवाजी बारकुंड :-**

काल ८६ एम.एल.डी. पाणी आलेले होते आणि आज ८३ एम.एल.डी. पाणी आलेले आहे. परवा ७२ एम.एल.डी. पाणी आलेले होते. एवढे कमी पाणी येत आहे. शिवाय, दोन-तीन तास पॉवर गेलेली होती.

**केशव घरत :-**

साहेब, तुम्ही ठाण्याच्या पाणीपुरवठा करणा-या सदस्यांसोबत मिटींग लावणार होते. त्याचे काय झाले?

**शिवाजी बारकुंड :-**

आपण मिटींग लावायचे ठरवलेले होते आणि आम्ही लावण्यासाठी फोनसुध्दा केलेला होता. परंतु, त्यांची गव्हर्निंग समितीची मिटींग असल्यामुळे आपल्याला त्यांच्याबरोबर मिटींग लावणे शक्य झालेले नव्हते. आपल्या मा. महापौर मॅडम ठाणे विभागाच्या मा. महापौरांसोबत मिटींग लावण्याबाबत बोलल्या होत्या. ठाणे महानगरपालिकेचे मा. महापौर दोन दिवसात मिटींग लावतो असे बोलले होते. त्याच्यानंतर ठाण्यामध्ये

ॲक्सीडन्ट झाल्यामुळे तेथील महापौरांनी पाच-सहा दिवस थांबायला सांगितलेले होते. शिवाय, आपल्या मा. महापौर मॅडम स्वतः त्यांच्यासोबत बोलल्या होत्या आणि स्थायी समितीच्या सदस्यांनी तिथे जायचेसुध्दा ठरविलेले होते. त्यामुळे सगळे सदस्य तिथे हजर असणार हे माहित होते.

**मिलन पाटील :-**

जर आपल्याला पाणी कमी येत असेल तर आपण तिकडे जाऊया.

**केशव घरत :-**

जर आपल्याला पाणी व्यवस्थित येत नसेल तर आपण तिकडे जाऊन चौकशी करुया.

**शिवाजी बारकुंड :-**

गव्हर्निंग कमिटीच्या मिटींगला गेलेले सगळे अधिकारी आणि अध्यक्ष असणार आहेत.

**मिलन पाटील :-**

आपण एक मिटींग तिथे लावून त्यांना सविस्तर विचारु.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

श्री. बारकुंड, गव्हर्निंग कमिटीचा आदेश आल्यावर तुम्ही या सर्व सदस्यांना तुमच्या सहीचे एक पत्र द्या.

**प्रकरण क्र. २२ :-**

नवघर शाळा मैदान कुंपणभिंत लगत मार्केट गाळे बांधणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. २३ :-**

मा. सभापती सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा विषय नामंजुर करण्यांत आला.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग आणि मनपा कर्मचारी वर्ग आपण सर्वांनी ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडल्याबद्दल सर्वांचे हार्दिक आभार मानुन आजची सभा संपल्याची मी जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी ०१.४५ वाजता.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**